# अर्थबोधपत्रिका

(आर्थिक, सामाजिक विषयांवरील विविध माहिती पोचविणारे माध्यम)

**अंक १३** **जानेवारी-फेब्रुवारी २००१**


- *आंतरराष्ट्रीय व्यापारी संस्था पेचात!*
- *परदेश, चित्रपट व भारतीय संस्कृती*
- *करारांमुळे भारतीय उद्योग अडचणीत*
- *तंत्रज्ञान : संशोधन व गरिबी*
- *नवे शतक व महिला*
- *मॉन्टेसोरींचे बालशिक्षण*
- *समता हाच शांततेचा पाया*


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

(केवळ खाजगी वितरणासाठी)

## अर्थबोधपत्रिकेविषयी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेतर्फे "अर्थबोधपत्रिका" हे आर्थिक, सामाजिक, व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन, नोव्हेंबर १९९८ पासून प्रकाशित करण्यात येत आहे. सर्वसामान्य मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे मांडणे, तसेच विविध समस्यांच्या संदर्भातील सैद्धांतिक व संकल्पनात्मक बाबी सोप्या शब्दांत देणे, हे या पत्रिकेचे उद्देश आहेत. विशेषतः अनेक विषयांवरील सखोल माहिती व सैद्धांतिक बैठक असणारे विश्लेषणात्मक लेख छापणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके व पुस्तके आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

जानेवारी २००१ पासून अर्थबोधपत्रिकेचे तिसरे वर्ष सुरू झाले असून तिसऱ्या वर्षाचा हा पहिला अंक आहे. सलग क्रमांकानुसार हा तेरावा अंक आहे.

नव्या वर्षाचे सहा अंक मिळविण्यासाठी देणगीमूल्य रुपये ५०/- (रुपये पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डर/चेकनें किंवा रोख पाठवावे. त्याबरोबर नाव व पूर्ण पत्ता पाठवावा. यासंबंधीचा अर्ज अंकात शेवटच्या पानावर देण्यात आला आहे.

**अर्थबोधपत्रिका : अंक १३ : जानेवारी-फेब्रुवारी २००१**

**संपादक :** रमेश पानसे - **संपादन सहाय्यक -** राज्यश्री क्षीरसागर

**प्रकाशक :** भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

**मुद्रक :** एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :** संपादक, अर्थबोधपत्रिका, 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६.

फोन: ५६५७१३२ / ५६५७२१० ई-मेल : ispe@vsnl.com

# अनुक्रमणिका


संपादकीय ३

१. लियाओचा ध्यास, पर्यावरणाची आस ! ४

२. आंतरराष्ट्रीय निधी व व्यापार संस्था दबावामुळे हैराण ? ९

३. हिन्दी चित्रपटांद्वारे भारतीय संस्कृतीचे धडे ! १३

४. भारतीय उद्योगांना नव्या तंत्रज्ञानाचा झटका ? १५

५. तंत्रज्ञान : संशोधन व गरिबी २०

६. नव्या शतकातील नवी आव्हाने २२

७. खास खवैय्यांसाठी.......... २५

८. शास्त्रशुद्ध बालशिक्षणाच्या प्रणेत्या २७

९. समता हाच शांततेचा पाया ! ३२


**सूचना** ●अर्थबोधपत्रिकेच्या सहा अंकांचे देणगीमूल्य रुपये ५०/- (पन्नास रुपये फक्त) डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टलऑर्डर/चेकने किंवा रोख पाठवावे. त्याबरोबर नाव व पूर्ण पत्ता पाठवावा. यासंबंधीचा अर्ज अंकाच्या शेवटी दिलेला आहे. कोणत्याही अंकापासून सभासद होता येते. ●या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे. ●अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. फक्त लेख प्रसिद्ध केल्यावर 'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने' अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ●लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठवावा ही अपेक्षा आहे.

# वाचकांचा प्रतिसाद

**अर्थबोधपत्रिकेचा** मी एक नियमित वाचक आहे. प्रत्येक अंकातील लेख व माहिती, महत्त्वपूर्ण आणि ज्वलंत विषयांवरील असते. त्यामुळे ज्ञानात भर पडते, विचारांना चालना मिळते आणि गरजेनुसार वापर करता यावा, अशी ही माहिती असते. त्याबद्दल धन्यवाद.

मात्र सहकार विषयाचे अर्थबोधपत्रिकेला वावडे आहे किंवा काय असे, सहकार या क्षेत्रात गेली चाळीस-बेचाळीस वर्षे काम करणाऱ्या माझ्यासारख्याला वाटते. गैरसमज करून न घेता, या विषयावर कधीतरी लिखाण प्रसिद्ध व्हावे / चर्चासत्रे आयोजित व्हावीत, ही इच्छा / अपेक्षा.

ॲड. मा. अ. देशमुख, पुणे.

**आपल्या** अंकाचे सध्याचे स्वरूप छान आहे. ते तसेच ठेवून सभासदांची संख्या वाढविण्यासाठी शुभेच्छा अंकांची योजना आपण स्वीकारू शकाल का ? म्हणजे, एखाद्या सभासदाने पाच किंवा त्यापेक्षा जास्त सभासदांचे वार्षिक देणगीमूल्य, रोख, डिमांड ड्राफ्ट किंवा मनीऑर्डरने आपल्याकडे पाठविले, तर अंकावर त्या व्यक्तीकडून शुभेच्छा असा शिक्का मारून किंवा तसा कागद चिकटवून मग त्यांना अंक पाठवाल का ?

तसेच भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने भारतीय नववर्ष स्वीकारून व भारतीय पंचांगाचा आग्रह धरून चैत्र-वैशाख, ज्येष्ठ-आषाढ असे अंक काढण्याचा विचार का करू नये ?

विनायक श्रीकृष्ण महाजन, कुडावळे, ता-दापोली.

**गेल्या** अंकातील (नोव्हेंबर -डिसेंबर २०००) 'बालपण नसलेली मुले', व इतर लेख वाचले. वाचून असे वाटले की, जागतिकीकरणाच्या आधीही व नंतर जर सुशिक्षित तरूणांना रोजगार नाही, तर शिक्षण नसलेल्यांचे भवितव्य काय ? समाजाने स्थानिक वस्तूंना प्रधान्य दिले तर बेरोजगारीचा प्रश्न सुटण्यास मदत होईल का ? शहरीकरणापासून बचाव होईल का ? तसेच बदलत्या अर्थव्यवस्थेत छोट्या उद्योगांनी व कामगारांनी कोणत्या संभाव्य धोक्यांचा विचार करून, कोणती कृती करावी, याबाबत माहिती मिळू शकेल काय ?

शाम सोनार, चाळीसगाव.

# संपादकीय

तिसऱ्या वर्षाचा हा पहिला अंक. लेखांची संख्या आणि मुख्य म्हणजे विषयांची विविधता वाचकांच्या लक्षात येईल. विविध विषयांमधील नवीन येणाऱ्या माहितीबद्दलच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा हा प्रयत्न आहे. वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात.

प्रसिद्ध इंग्रजी लेखिका पर्ल बक यांच्या एका अनोख्या पुस्तकाला त्यांनी स्वतःच लिहिलेली प्रस्तावना, या अंकातून आम्ही वाचकांसमोर आणली आहे. जगाचा शांततेचा शोध अजूनही चालूच आहे. किंबहुना आजच्या अस्वस्थ जगात हा शोध अधिकच महत्त्वाचा ठरत आहे. अशावेळी आर्थिक व सामाजिक समतेत शांततेचे मूळ शोधणारा, अर्धशतकापूर्वीचा पर्ल बक यांचा विचार आजही तेवढाच मूलभूत, आणि म्हणूनच महत्वाचा आहे. असाच आणि याहीपेक्षा जुना म्हणजे सुमारे शतकापूर्वीचा, मादाम मॉंटेसोरी यांचा बालशिक्षणातील स्वातंत्र्याचा विचार हाही आजच्या काळाशी सुसंगत असा विचार आहे. शिक्षणातील स्वातंत्र्याचा विचार हा अखेरीस राष्ट्राच्या स्वातंत्र्याकडे किंबहुना त्याहीपलीकडे मानवाच्या व्यक्ती स्वातंत्र्याकडे नेणारा म्हणून अर्थगर्भ आहे. मादाम मॉंटेसोरींचे स्मरण हे या दृष्टीनेही आपल्याला समयोचित वाटेल. भारताच्या आजच्या व्यापारविषयक, उद्योगविषयक, आणि तंत्रज्ञान-विषयक परिस्थितीचे आकलन देणारे असे काही लेख या अंकात देण्यात आले आहेत. पुढल्या शतकाची पायाभरणी करताना आपण कोणती आव्हाने घेऊन उभे आहोत, हे येथे मांडले आहे. विविध विषयांवरचे विचार वाचताना आपण त्यांची कालसुसंगतता आणि परिस्थितीसुसंगतता तपासून पाहायला हरकत नाही. विसावे शतक हे बऱ्याच अंशी प्रगतीचे शतक ठरले असले तरी ते तेवढेच अशांतीचेही शतक होते, हे जगाने अनुभवले आहे. पुढील शतकात तांत्रिक प्रगतीचा वेग वाढतच जाणार, हेही आपण ओळखू शकतो. पण ते अधिक अशांतीचे जावे, असे मात्र आपल्यापैकी कोणीच म्हणणार नाही. त्यामुळे नव्या शतकाच्या उंबरठ्यावर आपणही जॉन लेननच्या शब्दात म्हणूया की, "आमचे एवढेच म्हणणे आहे, शांतीलाही संधी द्या!" मात्र लेननचा रोख युद्धामुळे निर्माण होणाऱ्या अशांतीकडे होता, आपण आज अंगुलीनिर्देश करणार आहोत तो अशांती निर्माण करणाऱ्या सर्वच सामाजिक-आर्थिक-राजकीय व सांस्कृतिक घटनांकडे. एकविसाव्या शतकाचे स्वागत आपण आपल्या जागतिक शांतिविषयक अपेक्षांनी करू या. ■■

# लियाओचा ध्यास, पर्यावरणाची आस!

अमेरिकेच्या अध्यक्षांची एखाद्या राष्ट्राला भेट ही घटना आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाची मानली जाते. अशा भेटीत राष्ट्राध्यक्षांकडून स्थानिक व्यक्तींना चर्चेसाठी निमंत्रित केले जाणे, ही फारच मानाची बाब समजली जाते. जुलै १९९८ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन चीनच्या भेटीवर गेले असताना, हा मान मिळविला चीनमधील ४६ वर्षीय लियाओ क्झिओई या महिलेने. 'चीनमधील पर्यावरण' या विषयावरील चर्चेत लियाओने "आम्ही पर्यावरण रक्षणासाठी अमेरिकन संस्कृतीच्या विरोधात चीनमधील नागरिकांना जागरुक करण्याचे कार्य करीत आहोत, कारण अमेरिकेची संस्कृती व जीवनपद्धती पर्यावरणाचा विनाश करणारी आहे", असे ठामपणे सांगून, आपली व आपल्या संघटनेची भूमिका स्पष्ट केली. तेव्हा क्लिंटन यांनी त्यांची प्रशंसा केली. यानंतर लियाओचे जगभर कौतुक झाले आणि पर्यावरणातील 'नोबेल' समजल्या जाणाऱ्या 'सोफी' पुरस्काराने त्यांना गेल्यावर्षी (जून २०००मध्ये ) गौरविण्यात आले.

नॉर्वेतील 'सोफी फौंडेशन' तर्फे देण्यात येणाऱ्या या पुरस्काराची रक्कम एक लाख अमेरिकन डॉलर्स एवढी आहे. नॉर्वेतील प्रसिध्द लेखक जोस्टीन गार्डर यांच्या तत्त्वज्ञानावरील 'सोफीज वर्ल्ड' या पुस्तकाला खूप प्रसिध्दी मिळाली. या पुस्तकाच्या विक्रीमधून मिळालेल्या उत्पन्नातून हा पुरस्कार देण्यात येतो. गार्डर दाम्पत्याने १९९७ मध्ये 'सोफी फौंडेशन' ची स्थापना केली. हा पुरस्कार मिळाल्यानंतर लियाओ क्झिओई यांची एक प्रदीर्घ मुलाखत 'बीजिंग रिव्ह्यू' ने १४ ऑगस्ट २००० च्या अंकात प्रसिद्ध केली. त्या मुलाखतीच्या आधारे क्झिओई यांच्या विचारांची व कार्याची ओळख करून देणारा हा लेख.

लियाओ क्झिओई यांच्या विचारांचे व कामाचे सूत्र ' 5 - R' आहे. Reduce-- ( प्रदूषण करणाऱ्या वस्तूंचा वापर कमी करणे ), Reevaluate-- (वस्तूंचे मूल्यमापन करून पर्यावरणाची हानी टाळणाऱ्या वस्तूंचा वापर वाढविणे) Reuse-- (एकदा वापरलेल्या वस्तूंचा परत वापर करणे), Recycle-- (पुनर्प्रक्रिया करता येणाऱ्या वस्तूंचा वापर वाढविणे ), Rescue-- (नष्ट होत

असलेल्या नैसर्गिक साधनांचे व जीवांचे रक्षण करणे ). जग जवळ येत आहे, हे लक्षात घेऊन लियाओ यांनी आपल्या संस्थेचे नाव "ग्लोबल व्हिलेज बीजिंग" असे ठेवले आहे. "पश्चिमेकडील देशांमधील, विशेषत: अमेरिकेतील जीवनपद्धती, राहणीमान हे नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनाश करणारे आणि निसर्गनियमांविरुद्ध जाऊन केवळ भौतिकवाद व चंगळवाद वाढविणारे आहे. माणशी एक कार, घरी-दारी वातानुकूलित यंत्रे, 'वापरा व फेका' अशा वस्तूंचा अमर्याद वापर, जीवन जगणे म्हणजे केवळ मौजमजा हे उपभोगाचे तत्त्वज्ञान ग्राहकांच्या गळी उतरविणारी व पर्यावरण नासविणारी 'अमेरिकन संस्कृती' आत्मसात करण्याची चूक चीनमधील नागरिकांनी करू नये," असा प्रचार या संस्थेतर्फे करण्यात येतो.

मानवाने आपल्या परिसरातील, मानवेतर प्राणी आणि नैसर्गिक संपत्ती यांच्यातील निसर्गत: असलेले संतुलन कायम राखून निसर्गाशी, पर्यावरणाशी मैत्री साधणारे जीवन जगण्याचा प्रयत्न करावा, यासाठी नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याचे कार्य ही संस्था करीत आहे. याचा अर्थ नागरिकांनी राहणीमानाचा दर्जा कमी करावा किंवा विकासाला विरोध करावा, असा घेण्यात येऊ नये. विकासातून सातत्यपूर्ण विकास (sustainable development) आणि सातत्यपूर्ण उपभोग किंवा वापर हे साधले गेले पाहिजे, असे मत लियाओ व्यक्त करतात.

**विकासाची व्याख्या तपासण्याची गरज**

'सातत्यपूर्ण विकासा'ची व्याख्या स्पष्ट करण्याची गरज आहे, असेही त्यांचे मत आहे. केवळ पर्यावरणाचा विचार केला म्हणजे झाले, असे नाही तर, एखाद्या देशाच्या आर्थिक प्रगतीचा विचारही सर्वंकष दृष्टिकोणातून करण्यात आला पाहिजे. म्हणजेच आर्थिक प्रगतीचे मूल्यमापन करताना त्या देशातील नैसर्गिक साधनसामग्री, परिसरातील संतुलन कायम राखण्याची पातळी, पर्यावरणीय निकष व अशा संबंधित बाबींचा विचार केला पाहिजे, असे प्रतिपादन लियाओ करतात. या बाबींमध्ये, नैसर्गिक साधनांचा सुयोग्य व संतुलित वापर, ऊर्जेचा तसेच पाण्याचा संतुलित उपयोग, पर्यावरणीय समतोल राखणाऱ्या विविध ग्राहकोपयोगी वस्तूंचा वापर, ग्राहकांची अशा वस्तूंना असलेली मागणी आणि सरकारचे अशा बाबींसंदर्भातील धोरण, या अनेक घटकांचा समावेश होतो. आधुनिकीकरण याचा अर्थ निव्वळ उपभोग नव्हे तर भौतिक व आध्यात्मिक या दोन्हींचा योग्य मेळ साधणे, असा असायला हवा, यावर त्या भर

देतात. विकासाच्या संकल्पनेत बदल करण्याची गरज आहे, त्याचवेळी जगण्याची किमान पातळी सर्व देशांतील सर्व नागरिकांना उपलब्ध झाली पाहिजे, असे त्यांना वाटते.

**हा विरोधाभास का ?**

अमेरिकेतील व युरोपमधील जीवनपद्धती चंगळवादी व पर्यावरणाचा ऱ्हास करणारी असली तरी तिथे पर्यावरणाबाबत कडक कायदे आहेत, पर्यावरणाचा समतोल विचारात घेऊन तयार करण्यात आलेली यंत्रसामग्री आहे आणि नागरिकांना व सरकारला पर्यावरणाची जाणीव आहे. त्यामुळे अशा जीवनपद्धतीचा अवलंब करूनही त्यांना शुद्ध हवा, पाणी व निसर्ग मुबलक प्रमाणात उपलब्ध झालेला आहे, यावरून चीनमधील नागरिकांनी बोध घ्यावा यासाठी ही परदेशातील वस्तुस्थिती चीनमधील नागरिकांच्या नजरेस आणून देण्याचे महत्त्वाचे कार्य लियाओ व त्यांची संस्था करीत आहे. कारण चीनमध्ये नेमकी याऊलट परिस्थिती आहे. जगातील पहिल्या दहा अतिशय प्रदूषित शहरांमध्ये चीनमधील सात शहरांचा समावेश होतो, तरी चीनमध्ये याबाबत जागरुकता नाही. पाश्चिमात्य देशातील नागरिकांना प्रदूषण हा दुसऱ्या क्रमांकाचा महत्त्वाचा प्रश्न वाटतो तर चीनमधील नागरिकांच्या महत्त्वाच्या प्रश्नांच्या यादीत प्रदूषण किंवा स्वच्छ पर्यावरण याला अजिबात स्थान नाही असे एका जनमतचाचणीवरील अहवालात लियाओ यांनी वाचले. गरज असूनही त्याबाबत जाणीव नसणे, हा विरोधाभास त्यांना अस्वस्थ करून गेला. आणि त्यांना ही जागरुकता निर्माण करण्याचे काम अतिशय गरजेचे आहे, हे लक्षात आले. याबरोबर आणखीही एक घटना घडली. एकदा नोकरीच्या निमित्ताने 'पर्यावरण रक्षणातील महिलांची भूमिका' या विषयावरील वृत्तचित्र तयार करण्यासाठी त्या अमेरिकेत गेल्या, तेव्हा सुमारे चाळीस महिलांच्या मुलाखती त्यांनी घेतल्या. यासाठी त्यांना एकही चिनी महिला मिळू शकली नाही. वरील दोन्ही घटना त्यांच्या मनावर खोल परिणाम करून गेल्या आणि तेव्हाच त्यांनी, आपण पर्यावरण जागृतीचे काम करायचे, असे ठरविले.

**सामान्य पार्श्वभूमी पण संवेदनशीलता महत्त्वाची**

खरे तर लियाओ क्झिओई यांची पार्श्वभूमी पर्यावरणाशी संबंधित नाही. त्यांचा जन्म चीनमधील अतिशय सामान्य कुटुंबात झाला. लियाओ तीन भावंडातील मोठी मुलगी. त्या तीन वर्षाच्या असतानाच त्यांच्या आईने घटस्फोट घेतला. आईने काबाडकष्ट करून तीनही मुलांना वाढविले. लियाओ मोठी

असल्याने धाकट्या दोन भावांना सांभाळून जमेल तेवढी आईला घरकामात मदत करणे हेच तिचे मोठे काम होते. घरची आर्थिक परिस्थती अगदी बेताचीच होती. अशा परिस्थितीतही 'मास्टर्स इन फिलॉसॉफी' ही पदवी मिळवून लियाओ उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत पोचली. तिथे हॉटेलमध्ये वेट्रेस म्हणून काम करून तिने आपले ध्येय पूर्ण केले. अमेरिकेहून परतल्यानंतर कशीबशी सात चौरस मीटरची स्वतःची खोली त्यांनी मिळवली. उपजीविकेच्या शोधात असताना दूरचित्रवाणीवरील पर्यावरणविषयक कार्यक्रमांसाठी लेखिका व निर्माती अशी नोकरी त्यांनी स्वीकारली. या नोकरीच्या काळातच त्यांना वरील अनुभव आले. तसेच चीन पर्यावरणाच्या क्षेत्रात परकियांच्या मदतीशिवाय काही करू शकत नाही, असा सार्वत्रिक समज परदेशात असल्याचे त्यांना आढळले. मूळच्या संवेदनशील असलेल्या या व्यक्तिमत्वाला हे रुचले नाही आणि पर्यावरणाच्या क्षेत्रात एक सामान्य चिनी नागरिक व छोटीशी स्वयंसेवी संस्था काय करू शकते ते जगाला दाखवून द्यायचे, असा निश्चय त्यांनी केला. पर्यावरणाच्या क्षेत्रातील अत्युच्च पुरस्कार मिळवून त्यांनी आपला निश्चय पूर्णही केला आहे. या सोफी पुरस्काराची रक्कम लियाओ यांच्या आवडीच्या तत्त्वज्ञान या विषयावरील पुस्तकाच्या विक्रीमधूनच मिळणे हा त्यांच्यासाठी एक छानसा योगायोगही आहे. तत्त्वज्ञानाच्या शिक्षणात माणसाला अंतर्मुख करण्याची क्षमता आहे, या शिक्षणानेच अंतर्मुख झाल्याने आपण पर्यावरणाचा विचार करू शकलो, असे त्यांनी मुलाखतीत म्हटले आहे. परंपरागत चिनी तत्त्वज्ञानात निसर्गातील समतोलाचा, मानव व निसर्ग यांच्यातील संबंधांचा उत्तम पद्धतीने विचार करण्यात आला असल्याचे त्यांना वाटते.

**स्वयंसेवी संस्थेद्वारेच उत्तम काम**

पर्यावरणाच्या क्षेत्रात काम करण्यासाठी क्झिओई यांना स्वयंसेवी संस्थेचा मार्ग उत्तम वाटतो. कारण या संस्थाच नागरिकांशी संपर्क साधून त्यांना पर्यावरणाबाबत जागरुक करू शकतात. सरकारला या संदर्भातील नवनवीन व योग्य माहिती देऊन धोरणे आखण्यात मदत करू शकतात. तसेच उद्योगधंद्यांनीही पर्यावरणाची जपणूक करण्यासाठी त्यांच्याशी सतत संपर्क साधू शकतात. या तिहेरी मार्गाने प्रयत्न केल्यानेच अनेक देशांमधील पर्यावरणाशी संबंधित प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे असे त्यांचे निरीक्षण आहे. स्वयंसेवी संस्थांमधील लोकसहभाग, हा वरील तिहेरी मार्गासाठी अत्यंत उपयोगी आहे, असे मानणाऱ्या लियाओ यांनी आपल्या संस्थेच्या मार्फत अनेक प्रकारचे साहित्य

प्रसिद्ध केले आहे. त्यातील शब्दसंख्या चार लाखांवर आहे. शंभरावर भाषणे त्यांनी विविध कार्यक्रमांद्वारे दिली आहेत. 'टाईम फॉर एनव्हायर्नमेंट' या नावाने दूरचित्रवाणीवर एक नियमित कार्यक्रम संस्थेतर्फे प्रसारित करण्यात येतो. या संस्थेतर्फे प्रसिद्ध करण्यात आलेले साहित्य अनेकदा इतर प्रसारमाध्यमांनी पुनर्मुद्रित केले आहे. तसेच संस्थेने आयोजित केलेल्या 'अर्थ डे २०००' या कार्यक्रमात १२ प्रांतातील लाखो-करोडो नागरिक सहभागी झाले होते.

**पाश्चात्य जीवनपद्धती नाकारण्यावर भर**

आपल्या संस्थेच्या कार्यक्रमाचा मुख्य भर नागरिकांची तथाकथित आधुनिक समजली जाणारी पाश्चात्य जीवनपद्धती बदलण्याचा प्रयत्न करणे यावर आहे. कारण हा मार्ग सर्वसामान्यांना समजणारा, पटणारा असून त्यासाठी तांत्रिक ज्ञानाची गरज नाही. केवळ निसर्गाविषयी प्रेम व पर्यावरणाबाबत जागरूकता, संवेदनशीलता पाहिजे, असे लियाओ सांगतात. मानवाचा आर्थिक विकास हा खूप महत्त्वाचा असला तरी निसर्गाच्या विरोधात जाऊन तेच एकमेव ध्येय मानल्यानेच अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. तेव्हा असमाधान वाढविणाऱ्या, मानसिक शांती नष्ट करणाऱ्या भौतिक बाबींपासून दूर जाणे, पण मूलभूत गरजांची पूर्तता करणे, अशी संयमित भूमिका त्यांना योग्य वाटते. जीवनात बदल हवा, आधुनिकता हवी हे मान्य केले तरी त्यासाठी,आजचा मानव व मानवाच्या पुढील पिढ्या ज्यावर अवलंबून आहेत तो निसर्ग संपविणे, हा मार्ग असूच शकत नाही, असे मत त्या ठामपणे मांडतात. पाश्चिमात्यांचा विकास हा निसर्ग संपविणारा असल्याने आपण त्याच्या विरोधात आहोत, विकासाच्या विरोधात नाही, हे स्पष्ट करण्यास त्या विसरत नाहीत.

**चीनने वेळीच काळजी घेणे अत्यावश्यक**

चीनला सध्या पर्यावरणाच्या प्रश्नाने ग्रासले आहे. तेथील एक चतुर्थांश भूमी वैराण झाली आहे. एक षष्ठांश जमिनीचा कस संपून ती निरुपयोगी ठरण्याच्या मार्गावर आहे. जैविक विविधता संपत आहे. ओझोन नष्ट करणारे वायू आकाशात सोडण्यात अमेरिकेपाठोपाठ चीनचा दुसरा क्रमांक आहे. तेव्हा चीनने त्वरित पर्यावरणाची काळजी घेणे ही काळाची गरज आहे असे त्या कळकळीने सांगतात. अमेरिकेतील 'ग्रीन कार्ड' व शुद्ध हवा सोडून बीजिंग मधे शुद्ध हवेसाठी आयुष्य वेचणाऱ्या लियाओ यांचा आदर्श भारतासाठीही महत्त्वाचा आहे.

■■

# आंतरराष्ट्रीय निधी व व्यापार संस्था दबावामुळे हैराण ?

पश्चिमेकडील राष्ट्रांना व जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक यांसारख्या संस्थांना सध्या एका मोठ्या समान प्रश्नाला सतत सामोरे जावे लागत आहे, तो म्हणजे, विविध स्वयंसेवी संस्थांच्या मार्फत भांडवलशाहीच्या विरोधात करण्यात येणारी निदर्शने व जागतिकीकरणाची प्रक्रिया बंद करण्याबाबतचा दबाव, हा होय. या तीनही संस्थांनी एकत्र येऊन काहीही धोरणात्मक चर्चा करण्याचे ठरविले, की त्यांची चर्चा हाणून पाडण्यासाठी अमेरिकेत व युरोपमध्ये हजारो नागरिक रस्त्यावर येतात. आणि या नागरिकांना उद्युक्त करण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत, ही वस्तुस्थिती आहे. नागरिकांची अशी निदर्शने ही केवळ एक तात्पुरती घटना राहत नाही तर त्याचे लोण इतरत्रही पसरते व या आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांना जागतिकीकरणाच्या बाजूने निर्णय घेणे अशक्य होऊन बसते. विविध देशांमधील सरकारांनाही अशा जनआंदोलनांची दखल घेणे भाग पडत आहे. त्यामुळे या आंतरराष्ट्रीय संस्थांवरही या सर्व प्रकाराची नुसती दखल नव्हे, तर त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याची वेळ लवकरच येणार आहे. किंबहुना ती अगदी जवळ येऊन ठेपली आहे, असे दिसते. जागतिक बँकेच्या नूतन अहवालात विकसनशील राष्ट्रांमधील गरिबी दूर करण्यावर भर देण्यात आला आहे, यावरून हे सिद्ध होते.

या संदर्भात 'द इकॉनॉमिस्ट' या भांडवलशाहीच्या व जागतिकीकरणाच्या पुरस्कर्त्या असलेल्या व आर्थिक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यताप्राप्त असलेल्या साप्ताहिकाने नुकतेच दोन लेख प्रसिद्ध केले आहेत. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांवर या आंतरराष्ट्रीय घडामोडींचे बरे-वाईट परिणाम होत असून, भारतातही खुल्या आर्थिक धोरणाला, खाजगीकरणाला विरोध वाढतो आहे, या पार्श्वभूमीवर 'इकॉनॉमिस्ट' मधील दोन लेखांच्या आधारे प्रस्तुत लेख लिहिण्यात आला आहे.

**स्वयंसेवी संस्था, आर्थिक विकास व जागतिकीकरण**

स्वयंसेवी संस्थांचा उदय, आर्थिक विकास व जागतिकीकरण यांच्यातील परस्पर संबंध लक्षात घेऊनच या विषयाच्या खोलात जाणे इष्ट ठरेल.

संयुक्त राष्ट्रसंघाने १९६०-७० हे पहिले 'विकास दशक' म्हणून जाहीर केले. यात आर्थिक व सामाजिक विकासाला प्राधान्य देण्यात आले होते. एकीकडे, याच काळात विज्ञानातील नवनवीन शोधांमुळे आणि तंत्रज्ञानातील बदलांमुळे जगाच्या प्रवासाने आणखी एक वळण घेतले. या प्रवासाची गती एवढी होती की, देशादेशांमधील सीमारेषा त्याला रोखू शकल्या नाहीत. माहिती-तंत्रज्ञानातील क्रांतीने तर जगाला, 'एक खेडे' म्हणता येईल अशा टप्प्यावर आणून सोडले आहे. यामुळे व्यापारी व आर्थिक घडामोडींना बंधन राहिले नाही. जागतिकीकरण म्हणजे हेच सर्व होय. दुसरीकडे, आर्थिक व सामाजिक विकासाच्या ज्या प्रक्रिया चालू होत्या त्यात गरिबी व पर्यावरण या मुद्यांचा समावेश झाला. औद्योगिक विकास आणि व्यापार याला प्राधान्य देऊन आर्थिक व सामाजिक विकास साधण्याचे प्रयत्न चालू असतानाच, त्यातून विषमता वाढून, पर्यावरणाची हानी होत असल्याचे लक्षात येऊ लागले.

तिसरीकडे, राजकीय बदलांनीही आकार घेतला होता. साम्यवादाची पिछेहाट होऊन, भांडवलशाहीचे हातपाय खुल्या आर्थिक धोरणांच्या माध्यमातून जगभर पसरू लागले होते. जागतिकीकरणामुळे हे सर्व वेगाने घडत असतानाच, वैचारिक पातळीवरही या सर्व विषयांची दखल घेतली जात होती. यातूनच नवा मानवतावाद आकारास येत होता. (काहींच्या मते हा सुधारित साम्यवादच आहे !) हाच नवा मानवतावाद स्वयंसेवी संस्था स्थापन करून, त्यांच्या मार्फत पसरविण्यात येतो, असे म्हटले जात आहे. खरे तर स्वयंसेवी संस्थांचा उदय, अशा सामाजिक परिस्थितीमुळेच मोठ्या प्रमाणावर झाला, असे समजले जात आहे.

तंत्रज्ञान व विज्ञान यात प्रथम पश्चिमेकडील राष्ट्रांनी आघाडी घेतल्याने आणि भांडवलशाहीदेखील तेथेच प्रथम रुजल्याने मुक्त व्यापारावर तसेच आंतरराष्ट्रीय आर्थिक व व्यापारी संस्था-संघटनांवर त्यांचाच प्रभाव असणार, हे उघडच आहे. त्यामुळे जागतिकीकरण घडवून आणण्याला ही राष्ट्रे व या संस्था जबाबदार असून त्यांची भांडवलशाहीपूरक धोरणे गरिबांच्या विरोधातील आहेत, अशी खूणगाठ बांधून या स्वयंसेवी संस्था कार्य करीत आहेत, असा मतप्रवाह आता पश्चिमेकडील राष्ट्रांमध्ये विशेषत: भांडवलशाहीच्या समर्थकांमध्ये पसरतो आहे.

जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक व्यापार संघटना यांना विरोध करण्यामागे स्वयंसेवी संस्थांची ही भूमिका असावी, या निष्कर्षावर भांडवलशाहीचे समर्थक आले आहेत. या स्वयंसेवी संस्थांना मिळणारा पाठिंबा, हा आंतरराष्ट्रीय संस्थांसाठी आणखी एक काळजीचा विषय आहे. हा पाठिंबा

समाजातील सर्व स्तरांतून मिळत असून त्यात अनेकविध गट आहेत. प्रत्येक गटाची उद्दिष्टे व कार्यपद्धती वेगळी आहे. मात्र एकच गोष्ट या सर्वांसाठी समान आहे, ती म्हणजे, 'भांडवलशाहीचा पुरस्कार करणाऱ्या या आंतरराष्ट्रीय संस्थांबद्दल तीव्र तिटकारा,' असा समज भांडवलशाहीच्या समर्थकांनी करून घेतला आहे.

**जागतिकीकरणाला अनेकांचा विरोध का ?**

खरे तर पूर्वी भांडवलशाहीला विरोध हा होताच. तसा आज तो जागतिकीकरणाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. फक्त फरक एवढाच आहे की, पूर्वी हा विरोध, कामगार व मालक किंवा कंपन्या यांच्यामध्ये बहुतांश वेळा मोडला जात होता. आता तो आंतरराष्ट्रीय संस्था किंवा विकसित राष्ट्रांची धोरणे विरूद्ध सर्वसामान्य नागरिक अशाप्रकारे दिसून येतो. असे घडण्याची कारणे लक्षात घेण्यासारखी आहेत. एक म्हणजे, नोकऱ्यांमधील असमानता व त्यामुळे निर्माण होणारी विषमता. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कोणतीही कंपनी ज्या देशात स्वस्त श्रम उपलब्ध आहेत तेथून आपले काम करवून घेऊ शकते. विकसित देशांमध्ये श्रम महाग असल्याने तेथील अनेक कंपन्या भारतासारख्या परदेशातून काम करवून घेऊ लागल्या आहेत. त्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांमध्ये आपल्या हक्कांवर गदा येत असल्याची भावना निर्माण होत आहे.

दुसरे म्हणजे, मानवाधिकारांची संकल्पना व्यापक होत आहे. विकसित राष्ट्रांमधील नागरिकांसाठी नोकऱ्यांच्या संदर्भात आता तेथील राहणीमानाच्या दृष्टिकोणातून 'पुरेसे वेतन' असा शब्दप्रयोग करण्यात येत आहे. हाच निकष विकसनशील राष्ट्रांमधील नागरिकांसाठी लावला तर त्यांच्यावर अन्याय होतो आहे, असा त्याचा अर्थ होईल. अशा प्रकारे जागतिकीकरणाचे 'बळी ' वाढतील, नव्हे, वाढत आहेत.

विविध देशांमधील उद्योगधंद्यांबाबतही असेच काहीसे घडत आहे. या सर्व प्रक्रियेत स्पर्धा उत्पन्न झाल्याने विकसनशील राष्ट्रांमधील उद्योग संकटात सापडले आहेत. तेथे उत्पादनांचा दर्जा टिकविण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञान, यांत्रिकीकरण यावर भर देण्यात येत असल्याने, तेथील कामगारांना, व कर्मचाऱ्यांना नोकरकपातीला तोंड द्यावे लागत आहे. औद्योगिक मंदीचा परिणाम या राष्ट्रांना मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे. भारतात सध्या नेमके हेच घडत आहे. त्यामुळे या देशांमधूनही जागतिकीकरणाला विरोध वाढत आहे. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत पर्यावरणाची होणारी

हानी व त्याबाबत वाढती जागरूकता होय. तर अशा रितीने समाजातील सर्व घटकांना जागतिकीकरणाच्या विरोधात एकत्र येण्यासाठी स्वयंसेवी संघटनांची स्थापना करणे किंवा त्यांची मदत घेणे अपरिहार्य ठरले. म्हणूनच आज अमेरिका, युरोप व इतर अनेक राष्ट्रांमध्ये या संस्थांचे पेव फुटलेले दिसते.

**स्वयंसेवी संस्थांचा वाढता पसारा**

आज जागतिकीकरण ज्या वेगाने होत आहे त्यापेक्षा जास्त वेगाने स्वयंसेवी संस्थांचे काम जगात पसरत आहे. जागतिकीकरणाला कारणीभूत ठरलेल्या माहिती-तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळेच स्वयंसेवी संस्थांचे विचार व कार्य क्षणात जगाच्या काना-कोपऱ्यात पोचत आहे. अशा संस्थांचा परस्परसंपर्क वाढत असून त्या जनमत जागृतीचे काम जोमाने करीत आहेत. पूर्वी असलेला निधीचा प्रश्नही आता या संस्थांना भेडसावत नाही. कारण, त्यांना आता जगभरातून निधी उपलब्ध होत आहे. समाजातील गरीब, मध्यमवर्गीय, सुशिक्षित उच्च मध्यमवर्गीय आणि बरेचदा आर्थिक संपन्नता असणारेही, स्वयंसेवी संस्थांच्या कामातील आपला सहभाग सर्व बाजूंनी वाढवीत आहेत. या स्वयंसेवी संस्था एका बाजूने नागरिकांनीच स्थापन केल्या असल्याने त्या नागरिकांना जबाबदार असतातही, तर दुसऱ्या बाजूने 'स्वयंसेवी' असल्याने त्या कुणालाच जबाबदार नसतात. तरीही अशा संस्थांचा दबाव व प्रभाव वाढत असल्याने, त्यांच्यासाठीही काही नियम, कायदे, बंधने असावीत असा प्रयत्न आता काही देशांमध्ये सुरू आहे.

**सरकार, जागतिकीकरण आणि स्वयंसेवी संस्था**

विकसित व विकसनशील राष्ट्रांमधील सरकारे जागतिकीकरणाला रोखूही शकत नाहीत व त्याचे समर्थनही करू शकत नाहीत, अशी सध्याची स्थिती आहे. स्वयंसेवी संस्थांच्या वाढत्या प्रभावाबद्दलही नेमकी हीच स्थिती आहे. सरकारला आपल्या देशामधील उद्योगांचा, नागरिकांचा विकास करायचा आहे पण सामाजिक जबाबदारी लक्षात घेऊन कोणतेही सरकार एक निश्चित भूमिका घेण्याच्या तयारीत नाही. त्यामुळे जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक व्यापार संघटना यांना होणारा विरोध असाच चालू राहणार आहे. कदाचित भविष्यात तो वाढेलही. स्वयंसेवी संस्थांच्या मार्फत का होईना पण जागतिक घडामोडींमध्ये 'लोकसहभाग' हळूहळू वाढतो आहे, हे चित्र नक्कीच आशादायक आहे.

■■

(संदर्भ - ' द इकॉनॉमिस्ट'- २३ ते २९ सप्टेंबर व २१ ते २७ ऑक्टोबर २०००)

# हिन्दी चित्रपटांद्वारे भारतीय संस्कृतीचे धडे !

हिन्दी चित्रपट हा तमाम भारतीयांसाठी एक मनोरंजनाचा विषय आहे. हिन्दी चित्रपट न पाहिलेली किंवा त्याविषयी कोणत्याही प्रकारची माहिती नसलेली व्यक्ती लाखात एक असेल कदाचित. या चित्रपटांच्या प्रारंभीच्या काळापासूनच समाजातील बऱ्या-वाईट घटनांचे प्रतिबिंब त्यात लगेचच उमटत होते. आजही तीच प्रथा चित्रपटांनी जिवंत ठेवली आहे. भारतीय संस्कृती देखील हिन्दी चित्रपटांनी बऱ्यापैकी चित्रित केली आहे. या चित्रपटसृष्टीच्या व भारतीय संस्कृतीच्या अनेक चाहत्यांपैकी एका 'परदेसी ' चाहत्याने चित्रपटांच्या माध्यमातून अमेरिकन संस्कृतीत, भारतीय मूल्ये व संस्कृती रुजावी, अशी 'छोटीसी आशा' मनी बाळगली आहे. यासाठी अर्थातच 'चॅनेल्सचा' वापर क्रमप्राप्तच आहे. या बड्या 'असामी'चे नाव आहे किशोर लुल्ला.

अभिजात इंग्रजी परंपरा व मूल्ये यांचीही 'कदर' असणारे किशोर लुल्ला हे काही वर्षांपूर्वी लंडन येथे स्थायिक झाले. 'बॉलीवूड फॉर यू' ( B 4 U ) या नावाने हिन्दी चित्रपटांसाठी सर्वात मोठे 'नेटवर्क' त्यांनी सुरू केले आहे. श्री. लुल्ला यांनी प्रथम 'परदेशातील तीन कोटी दक्षिण आशियाई नागरिक' हा मोठा ग्राहकवर्ग मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. कारण या नागरिकांना आता आयुष्याचा मधला टप्पा गाठल्यावर आणि आर्थिकदृष्ट्या स्थिरस्थावर झाल्यानंतर, 'मागे वळून पाहायला' थोडीतरी उसंत मिळते. मग समवयस्कांबरोबर गप्पा मारताना जुन्या आठवणींची शिदोरी त्यांच्या कामी येते. अशावेळी अर्थातच हिन्दी चित्रपटांसाठी पैसा खर्च करण्याची त्यांची तयारी होते, ही बाब श्री.लुल्ला यांनी स्वानुभवाने हेरली.

श्री.लुल्ला आपल्या 'बॉलीवूड फॉर यू' ला 'एशियन HBO' असे म्हणतात. यासाठी मोठी बाजारपेठ मिळविण्यासाठी त्यांनी प्रथम गीतोंका नजराना 'विनामूल्य' पेश केला आहे. फक्त पाच महिन्यातच त्याच्या चॅनेलने गाण्यांसाठी टी. व्ही. बघणाऱ्यापैकी एक तृतीयांश ग्राहकांना आकर्षित केले आहे. आणखीही नव्या चॅनेल्स सुरू करून पाच लाखांवर ग्राहक मिळवायचे, असे त्यांनी ठरविले आहे. श्री. लुल्ला यांच्या कुटुंबाला पूर्वीपासूनच चित्रपटांचे आकर्षण होते. 'इरॉस

एन्टरटेनमेन्ट' ही कंपनी त्यांच्या वडिलांनी स्थापन केली होती. दोन हजारावर हिन्दी चित्रपटांचे वितरण करण्याबाबतचे आंतरराष्ट्रीय हक्क या कंपनीने मिळविले होते. 'बॉलीवूड फॉर यू 'ची ही जुन्या व नव्या चित्रपटांची ठेव या नव्या उद्योगासाठी फार महत्त्वाची ठरली आहे.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतीय चित्रपटांबद्दल व संस्कृतीबद्दल परदेशांत बरेच आकर्षण आहे, असे लुल्ला म्हणतात. पाश्चात्य चित्रपटांमधे व समाजजीवनात सतत आढळणारा हिंसाचार, अनावश्यक अश्लील दृष्ये आणि विस्कळित कुटुंबे या सर्वांना तेथील नागरिक विटले आहेत. मूल्यांची जोपासना, बालकांवरील नैतिकतेचे संस्कार आणि कौटुंबिक प्रेम व जिव्हाळा या सर्वांना मुकलेल्या पाश्चात्यांना भारतीय संस्कृती जाणून घेण्याची इच्छा असते, असे आपल्याला नेहमीच आढळल्याचे ते सांगतात. 'ताल' सारख्या चित्रपटांना मिळालेल्या प्रतिसादावरून हे सिद्ध होतेच, असे त्यांना वाटते.

'बॉलीवूड फॉर यू'ला आर्थिक व वैचारिक पाठबळ दिले आहे ते प्रसिद्ध व अतिश्रीमंत उद्योगपती श्री. लक्ष्मी मित्तल आणि हिन्दी चित्रपटांना मोठा निधी उपलब्ध करून देणारे श्री. भरत शाह यांनी. सर्व बेरजा-वजाबाक्या केल्यानंतर २००१ च्या अखेरीस चार लाख अमेरिकन डॉलर्स एवढा नफा होण्याची आशा या सर्व दिग्गजांना आहे. अर्थात असे अंदाज व्यक्त करणे हे सोपे आहे, पण प्रत्यक्ष तसे घडणे हे तेवढे सोपे नाही, याची जाणीवही यांना आहे. या क्षेत्रातील सोनी टी. व्ही.च्या 'एशियन आर्म' , रूपर्ट मर्डोक यांच्या 'स्टार टी. व्ही', आणि 'झी ' टी. व्ही. या सर्वांशी त्यांना स्पर्धा करावी लागणार आहे.

व्यापार कोणताही असला तरी त्यात महत्त्वाचा आहे तो ग्राहकवर्ग. हा मध्यमवयीन ग्राहक आज लाभला, तरी त्यांची पुढील पिढी इकडे वळेलच याची खात्री नाही, कारण या पिढीला हिन्दी समजतच नाही, मग लिहिता-वाचता येणे व गाणी आणि संवाद यांतून चित्रपटाचा आनंद मिळून, त्यातून सहजपणे संस्कार होणे ही अवघड बाबच आहे. अमेरिका, इंग्लंड व इतर देशांत स्थायिक झालेल्या भारतियांच्या शाळा-कॉलेजमधील बहुतांश मुलामुलींना भारतीय भाषा, नव्हे, राष्ट्रभाषा ( ? ) हिन्दी येत नाही, हे भारतीय संस्कृतीच्या या प्रेमींना खेदाने लक्षात ठेवावे लागणार आहे. एकदा देशाशी असलेली नाळ कापल्यावर पुन्हा ती जोडण्याचा प्रयत्न खूप कठीण आहे. पूर्व ती पूर्व व पश्चिम ती पश्चिम हे खरे, असे म्हणण्याची वेळ तर लुल्ला यांच्यावर येणार नाही ना ! ■■

( संदर्भ - 'द इकॉनॉमिस्ट ', २१ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर २००० )

# भारतीय उद्योगांना नव्या तंत्रज्ञानाचा झटका ?

भारताने १९९० च्या दशकाच्या सुरूवातीस स्वीकारलेल्या खुल्या आर्थिक धोरणाचे परिणाम आता अनेक क्षेत्रात जाणवू लागले आहेत. भारतीय बाजारपेठेत विदेशी उत्पादनांचा शिरकाव मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. या उत्पादनांमध्ये कितीतरी दैनंदिन वस्तूंचा (घड्याळे, सौंदर्यप्रसाधने, खाण्या-पिण्याचे पदार्थ, मोटारी इ.) समावेश आहे. याशिवाय, अपवाद वगळता परकीय तंत्रज्ञानावर तर भारत पूर्वीपासूनच अवलंबून आहेच. तंत्रज्ञानाबाबत गेल्या काही वर्षात आपल्याकडे सुधारणा झाली असली, तरी ती पुरेशी नक्कीच नाही. अशा स्थितीत भारतीय उद्योगांना आता जागतिक स्पर्धेला सामोरे जावे लागत आहे, त्यामुळे स्पर्धेत टिकण्यासाठी व उत्पादनांचा दर्जा वाढविण्यासाठी भारतीय उद्योग, नवे तंत्रज्ञान आणणे, परकीय भांडवल आणणे, श्रमावरील खर्च कमी करण्यासाठी कामगार व कर्मचाऱ्यांना स्वेच्छानिवृत्ती योजना स्वीकारण्याचा पर्याय देणे, अशी पावले उचलीत आहेत. या सर्व प्रकारामुळे औद्योगिक क्षेत्रात फारच अस्थिरतेचे वातावरण आहे. त्यातच मंदीमुळे आणखी भर पडली आहे. अशा परिस्थितीतच वेगवेगळ्या जागतिक करारांवर भारत सरकारने केलेल्या सह्यांमुळे काही नवीनच प्रश्न निर्माण होत आहेत.

पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी जागतिक पातळीवरील 'मॉन्ट्रियल प्रोटोकॉल' वर भारताने (तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ) १९८७ मध्ये सही केली. त्या कराराचे परिणाम आता दिसण्यास सुरूवात झाली आहे, यामुळे भारतातील वातानुकूलित यंत्रे (एअर कंडिशनर्स ), शीतपेट्या (रेफ्रिजरेशन), फोम, एरोसोल आणि आग विझविण्याची यंत्रे (फायर एक्सटिंग्वीशर) तयार करणारे अनेक उद्योग अडचणीत येण्याची शक्यता मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली आहे. यासंदर्भातील माहिती देणारा हा लेख.

**मॉन्ट्रियल करार**

वर उल्लेखित सर्व उद्योगांमुळे पर्यावरणाचे नुकसान होते, असे मानले जाते, कारण या उद्योगांतील महत्त्वपूर्ण घटक 'क्लोरोफ्लुरोकार्बन' हा आहे. या वायुमुळे वातावरणातील 'ओझोन'चा थर नष्ट होतो. ओझोनमुळे सूर्यप्रकाशातील

अतिनील किरणे पृथ्वीवर पोचण्यास प्रतिबंध होतो. ही किरणे जर पृथ्वीवर पोचली, तर मानवी आरोग्य धोक्यात येईल. त्वचेचे कर्करोग व तत्सम आजारांचे प्रमाण वाढेल. म्हणून ओझोन थर महत्त्वाचा आहे, हे लक्षात आल्यामुळे या वायूच्या वापरावर नियंत्रण ठेवून २००५ पर्यंत त्यांचा वापर ५० टक्क्यांनी कमी करावा आणि २०१० पर्यंत हा वापर पूर्णपणे थांबवावा, असे 'मॉन्ट्रियल' कराराद्वारे ठरविण्यात आले. आता हा घटक वापरायला नको, म्हणजे त्याला पर्याय हा हवाच, कारण आजच्या युगात या चैनीच्या बाबी न राहता, त्या दैनंदिन जीवनातील गरजा (?) झाल्या आहेत. तेव्हा अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरणे या, व इतर पर्यायांचा अवलंब करण्यासाठी ज्या उद्योगांना आर्थिक मदत हवी असेल तर, त्यांना काही अटींवर ती देण्यासाठी आंतरराष्ट्रीय निधी देखील स्थापन करण्याचे कराराच्या वेळी ठरविण्यात आले. आता या कराराचे पालन कसे करायचे, हाच खरा भारतीय उद्योगांपुढील पेच आहे.

**भारतीय उद्योगांपुढील पेच**

हा पेच तिहेरी आहे. एक म्हणजे, पर्यावरणाची काळजी करायची तर या उद्योगांना तंत्रबदल करून व त्यासाठी अधिक गुंतवणूक करून कराराचे पालन केले पाहिजे. मात्र हे असे करणे म्हणजे, पाश्चात्य उद्योगांच्या कात्रीत सापडणे होय. हे कसे, ते पुढे स्पष्ट केले आहे. दुसरे म्हणजे, हा करार धुडकावून टाकावा तर आपल्याच देशातील पर्यावरणाला व समाजाला आघात पोचणार. आणि मग नवे, पर्यावरणाचे नुकसान न करणारे तंत्रज्ञान वापरणारे पाश्चात्य उद्योग या भारतीय उद्योगांवर कुरघोडी करणार. तिसरे म्हणजे, आपला उद्योग बंद करून नवा मार्ग शोधणे. करारावर सही केल्यामुळे २०१० पर्यंत यापैकी एक काहीतरी स्वीकारावे लागणार आहेच. आता यातून बाहेर पडण्यासाठी काय करायचे ? या प्रश्नाचे उत्तर केंद्र सरकारचा संबंधित विभाग आणि या उद्योगाशी संबंधित संघटना यांच्याजवळही नेमकेपणाने, उपलब्ध नाही.

**विविध पर्यायांचा गोंधळ**

भारतीय उद्योगांपुढील पहिला पेच म्हणजे, या कराराचे पालन करण्यासाठी नवे तंत्रज्ञान मिळविणे. पण ते मिळविणे म्हणजे आपणच आपल्या पायावर धोंडा पाडण्यासारखे आहे. कारण या उद्योगांतील महत्त्वपूर्ण घटक 'क्लोरोफ्लुरोकार्बन ' हा आहे. त्याऐवजी 'HFC-134 a ' हा घटक वरीलपैकी काही उद्योगांमध्ये चालू शकतो. गेल्या काही वर्षांपर्यंत हे तंत्रज्ञान भारताजवळ नव्हते. पण हैदराबाद येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी' या संस्थेने हे

तंत्रज्ञान नुकतेच तयार केले आहे. यापूर्वी हे तंत्रज्ञान 'ड्यू पॉन्ट' सारख्या बहुराष्ट्रीय कंपनीकडून भारताला विकत घ्यावे लागत होते. 'HFC-134 a ' हा 'ग्रीनहाऊस गॅस' समजला जातो. त्यामुळे पर्यावरणाला धोका उत्पन्न होत नाही. पण आता एक नवीनच अडचण अशी उद्‌भवली आहे की, पर्यावरणाशी संबंधित नव्या 'क्योतो प्रोटोकॉल' प्रमाणे हा वायूदेखील वापरण्यावर बंदी येऊ शकेल. सध्या परदेशातील ज्या कंपन्या 'HFC-134 a' चा उपयोग करीत आहेत, त्या आता हळूहळू 'हायड्रोकार्बन्स' हे आणखी नवे तंत्रज्ञान वापरीत आहेत. या कंपन्यांमध्ये कोकाकोला, इलेक्ट्रोलक्स अशा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा समावेश आहे.

या सर्व प्रकारात भारतीय उद्योग कात्रीत सापडले आहेत. कारण एकीकडे बहुराष्ट्रीय कंपन्या अत्याधुनिक, स्वस्त व पर्यावरण जपणारे तंत्रज्ञान वापरून आपली उत्पादने खपविण्याचा प्रयत्न करीत असतात, तर दुसरीकडे तेच तंत्रज्ञान मिळविणे भारतीय उद्योगांना शक्य होत नाही, कारण हे हस्तांतर ही अतिशय किचकट बाब आहे.. आणि 'मॉन्ट्रियल प्रोटोकॉल' प्रमाणे भारतातील उद्योगांना हे तंत्रज्ञान विकत घेता येणार आहे, पण भारतात तयार करता येणार नाही.म्हणजेच विकसित राष्ट्रांनी व बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विकसनशील राष्ट्रांमधील उद्योगांची कोंडी केली आहे. जागतिक बाजारपेठेवर व तिसऱ्या जगातील राष्ट्रांवर नियंत्रण ठेवण्याचा हा आणखी एक प्रयत्न आहे, असे तर नाही.

**तंत्रज्ञानाच्या हस्तांतरातील अडचणी**

परकीय तंत्रज्ञान मिळविण्याचे तीन मार्ग आहेत. एक, लायसन्स मिळविणे व त्याचवेळी काही वर्षांसाठी स्वामित्वधन (रॉयल्टी) देणे किंवा तंत्रज्ञानाची किंमत एकरकमी चुकती करणे. दोन, परकीय कंपनीबरोबर करार करणे, तीन, असे तंत्रज्ञान स्वतः तयार करणे. तंत्रज्ञानाचे हस्तांतर म्हणजे उद्योगाला लागणारी यंत्रसामग्री वापरणे व ते उत्पादन तयार करणे या सगळ्याचे ज्ञान संबंधितांना देणे होय. अशा सुधारणा करण्यासाठी आंतरराष्ट्रीय निधीतून आर्थिक मदत मिळण्याची सोय असली तरी, जे देश नवे तंत्रज्ञान आपल्या देशात तयार करू इच्छितात, त्यांना मात्र कोणत्याही प्रकारची मदत या कराराप्रमाणे मिळू शकणार नाही, अशी 'आपली' सोय विकसित राष्ट्रांनी करून भारतासारख्या देशांची अडवणूक केली आहे.

आपले तंत्रज्ञान दुसऱ्या कंपनीला देताना, त्या कंपनीचे समभाग (शेअर्स) काही प्रमाणात आपल्या हाती ठेवण्याचा प्रघात औद्योगिक क्षेत्रात आहे. त्यामुळे भारतीय उद्योगांवर परकियांचा ताबा येण्याची शक्यता आहे. तसेच

परकीय कंपन्यांचे स्वामित्वशुल्क देण्याची भारतीय उद्योगांची आर्थिक शक्ती असेलच, असेही नाही. समजा, कमीतकमी खर्चात हे तंत्रज्ञान मिळविण्याचा प्रयत्न उद्योगांनी केला तर, देशातील पर्यावरण धोक्यात येऊ शकते. म्हणजे कोणत्याही मार्गाने अत्याधुनिक तंत्रज्ञान मिळविण्यासाठी भारतीय उद्योगांना अडचणीत यावेच लागेल, असा हा प्रकार आहे.

याशिवाय, सध्याच्या व्यापारी जगात कोणते तंत्रज्ञान, कोणत्या किंमतीत व कुणाला द्यायचे हा निर्णय, जे बाजारावर नियंत्रण ठेवू शकतात तेच घेणार हे उघडच आहे. भारतातील 'रेफ्रिजरेशन' उद्योगावर वर्चस्व असणाऱ्या बहुतेक बहुराष्ट्रीय कंपन्या सध्या 'HFC-134 a ' यावर लक्ष केंद्रित करीत आहेत, कारण या 'HFC-134 a ' वर अमेरिकेसारख्या राष्ट्राचा एकाधिकार आहे. तसेच १९९७ मध्ये एक किलो 'HFC-134 a 'साठी २.५ डॉलर एवढा खर्च येत होता, तो आता ५.५ डॉलर इतका वाढला आहे. नवे तंत्रज्ञान मिळविण्यासाठी, करारात एक अब्ज डॉलर मंजूर करण्यात आले असले तरी, आतापर्यंत विकसनशील राष्ट्रांना फक्त तीस कोटी डॉलर एवढीच मदत मिळाली आहे. "ही मदत मिळविण्याची सर्व प्रक्रिया अतिशय किचकट व त्रासदायक आहे," असे केन्द्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालयात उच्चपदावर काम केलेल्या निवृत्त अधिकाऱ्याने स्पष्ट केले आहे. हे भारतीय उद्योग पाश्चात्यांच्या तुलनेत दोन टप्प्यांवर मागे आहेत. यापैकी पहिला टप्पा आहे, तो म्हणजे 'क्लोरोफ्लुरोकार्बन' तंत्रज्ञानावरून 'HFC-134 a' या तंत्रज्ञानावर जाणे. त्यापुढच्या 'हायड्रोकार्बन्स' या तंत्रज्ञानापर्यंत पोचणे, हा दुसरा टप्पा आहे. मात्र यात मेख अशी की, अशी मदत एका उद्योगाला फक्त एकदाच, तीही पहिल्या टप्प्यावर मिळू शकते. म्हणजे असे की, भारतीय उद्योगांना हायड्रोकार्बन्स या तंत्रज्ञानावर पोचणे आर्थिक दृष्टीने कठीण होणार आहे. कारण यासाठी कोणतीही मदत कराराप्रमाणे मिळणार नाही.

**छोटे उद्योग आणखी अडचणीत**

वरील उद्योगांमध्ये अनेक लघु उद्योगांचा समावेश होतो. मोठ्या उत्पादकांसाठी काम करणारे हे छोटे उद्योग म्हणजे बरेचदा स्थानिक सेवा केन्द्र असते. संख्येने जास्त असणाऱ्या या लोकांनी आता काय करायचे असा प्रश्न आहे. नव्या तंत्रज्ञानासाठी आर्थिक मदत मिळविण्यासाठी, एखाद्या उद्योगात किती प्रमाणात क्लोरोफ्लुरोकार्बन वापरला जातो, ते बघून मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येणार आहे. प्रतिवर्षी किमान १० टन क्लोरोफ्लुरोकार्बन वापरणारे उद्योगच मदतीस पात्र ठरणार आहेत, असे 'ऑल इंडिया एअर कंडिशनिंग अँड रेफ्रिजरेशन

असोसिएशन ' चे अध्यक्ष श्री. कमल सहदेव यांनी स्पष्ट केले आहे. तेव्हा अशा सर्व संबंधित उद्योगांनी एकत्र येऊन तोडगा काढावा यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न करण्यात येत आहेत, असे सरकारचे म्हणणे आहे.

एरोसोल क्षेत्रात अनेक छोटे उद्योग आहेत. बहुतेक सर्व उद्योग मोठ्या कंपन्यांच्या उत्पादनांचे वितरण करतात. या क्षेत्रासाठी 'हायड्रोकार्बन एरोसोल प्रॉपेलन्ट' (HAP ) हा पर्याय असून, तो 'गॅस ऑथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड' यांच्याकडे उपलब्ध आहे. पण त्यासाठी बाजारपेठ असल्याशिवाय त्याचे उत्पादन करण्याची त्यांची तयारी नाही. आणि तो पर्याय हाताशी नाही म्हणून छोट्या उद्योगांना पुढचे पाऊल टाकता येत नाही. कोंबडी आधी की अंड आधी ? यातील हा प्रकार आहे. या उद्योगांशी संबंधित असा एक महत्त्वाचा घटक आहे तो म्हणजे, या उद्योगांची आजची यंत्रसामग्री दुरुस्त करणाऱ्यांचा. म्हणजे पुरक उद्योगांचा. नवे तंत्रज्ञान वापरात आले तर ते ही अडचणीत येणार, हे उघडच आहे.

आर्थिक मंदीच्या गंभीर परिस्थितीत व जागतिकीकरणाच्या चक्रात भारतीय उद्योग कशा प्रकारे सापडले आहेत, ते यावरून समजते. 'बळी तो कान पिळी ' हाच जागतिकीकरणाचा न्याय असेल तर भारतीय उद्योगांनी करार धुडकावून, नवे, पर्यावरणाची हानी न करणारे पण स्वदेशी तंत्रज्ञान वापरण्याचा मार्ग स्वीकारायचा का ? ■■

(संदर्भ - ' डाऊन टू अर्थ ' १५ ऑक्टोबर २०००)

*जो देश परकीयांना आपल्या येथे अमर्याद चढाओढ करण्याची मुभा देतो, तो उपासमारीच्या स्थितीला, आणि परकीयांच्या मनात आले तर त्यांतून पारतंत्र्याच्या अवस्थेला, पोचू शकतो.* *( हरिजन, दि. २० जून १९३६)*

*यंत्रांना मी जो विरोध करतो, त्याचे मूलभूत कारण हे आहे की, इतर राष्ट्रांची पिळवणूक करण्यास पाश्चात्य राष्ट्रे समर्थ बनली, ती या यंत्रांमुळेच. स्वत: यंत्रे म्हणजे निर्जीव ठोकळे आहेत.त्यांचा उपयोग चांगला किंवा वाईट करता येण्यासारखा आहे. पण त्याचा दुरूपयोग सहज होऊ शकतो हे आपण पाहतोच. यंत्रांचे एक विशिष्ट स्थान आहे, यंत्र कायम राहण्यासाठी आले आहे.पण अवश्य त्या मानवी श्रमांचे उच्चाटन करण्याची मुभा त्याला देता कामा नये.* *गांधी विचार दर्शन ( अर्थकारण )*

# तंत्रज्ञान : संशोधन व गरिबी

तंत्रज्ञानाचा विकास हे विसाव्या शतकाचे महत्त्वाचे लक्षण आहे. सोयी-सुविधांचे मोठे विश्व यामुळे निर्माण झाले. रोजच्या अन्नापासून ते उपग्रह दळणवळणापर्यंतचे क्रांतिकारक बदल विसाव्या शतकाने आपल्याला दिले. सुखाच्या शक्यता जशा निर्माण झाल्या, तशाच सुखाच्या लालसाही या विकासाने वाढवत नेल्या. यातून पर्यावरणाचा विनाश, आरोग्याला धोका आणि दारिद्र्याला स्थैर्यही प्राप्त झाले. टिकून राहिलेली गरिबी आणि पर्यावरणाचा घसरता दर्जा याही गोष्टी विसाव्या शतकाने आपल्या पदरात टाकल्या आहेत.

ब्रुंडलँट कमिशनचा अहवाल १९८७ मध्ये प्रसिद्ध झाला; त्यावेळी, गरिबी आणि पर्यावरण यांचा परस्पर संबंध जगापुढे ठळकपणे मांडला गेला. त्यानंतरच्या रिओ, व्हिएन्ना, कैरो, बरबाडोस, कोपनहेगन, बीजिंग, इस्तंबूल, रोम अशा विविध ठिकाणच्या, गेल्या दशकात झालेल्या, संयुक्त राष्ट्रसंघाच्या, सर्वच परिषदांमधून या विषयाच्या चर्चेला वाढते स्थान मिळत गेले. अलीकडे, यू. एन. डी. पी. व युरोपियन कमिशन यांनी एकत्रितपणे राबविलेल्या कार्यक्रमातही गरिबीचे निर्मूलन आणि पर्यावरणाचे पुनरुज्जीवन या संबंधातील उपायांचा शोध घ्यायचा प्रयत्न केला. यातून लक्षात आले ते असे की, इथून पुढच्या काळात लक्ष केंद्रित करायला हवे आहे ते, गरिबांना नि पर्यावरणाला अभिमुख अशा तंत्रविकासावर आणि अशा सोयीसुविधांच्या निर्मितीवर.

उदाहरणार्थ, ऊर्जेचाच प्रश्न घ्या. त्याची गरज गरीब, श्रीमंत अशा सर्वच कुटुंबांना असते. परंतु श्रम, वेळ नि पैसा यांचे गणित मांडले तर श्रीमंतांपेक्षा गरिबांना ऊर्जेच्या दर एककामागे अधिक खर्च करावा लागतोय. एवढेच नव्हे तर ज्या पद्धतीच्या ऊर्जेचा जळण म्हणून वापर गरिबांना करावा लागतोय, त्यातून त्यांच्या- आणि त्यातही त्यांच्यातील महिला व लहान मुलांच्या आरोग्यालाही धोका संभवतो. हे चित्र कसे बदलायचे ? हा प्रश्न केवळ व्यापारी पद्धतीच्या ऊर्जेच्या पुरवठ्याचा प्रश्न नाही तर तो आहे, ही सेवा गरिबांना कार्यक्षमतेने पुरविण्याचा. दिव्यांची चांगली सोय, पाणीउपशाची सोपी व कार्यक्षम तंत्रे आणि आरोग्यकारक चुली स्वयंपाकासाठी उपलब्ध करून देण्याचा. आज शहरांतील लोकसंख्येचे प्रमाण

वाढते आहे तसतसे शहरांतील गरिबांची संख्याही वाढते आहे. त्यांची हीन दर्जाची घरे, स्वच्छ पाण्याचा अभाव, सांडपाण्याच्या किंवा कचऱ्याच्या विल्हेवाटीच्या सोयींचा अभाव, आणि सोबत, उर्जासोयींचीही कमतरता यांमुळे अत्यंत अनारोग्यकारक वातावरणात या लोकांना जगावे लागत आहे. अशावेळी बऱ्यापैकी सगळ्या सोयी आणि स्वच्छ, आरोग्यदायक पर्यावरण यांच्यामुळे सुध्दा गरिबीचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. परंतु हे होणार कसे ? सर्व संशोधनांचा रोख जर व्यापारी पद्धतीच्या आणि म्हणून उच्च वर्गाच्या सुखसमृद्धीच्या दिशेने असेल तर हे घडावे कसे ? उदाहरणार्थ, दरसाल २०० ते २५० कोटी रुपये केवळ आरोग्यविषयक संशोधनांवर खर्च होत असले तरी, ज्या तऱ्हेच्या आजारांना जगातील ९०टक्के लोकांना तोंड द्यावे लागते, त्या प्रकारच्या आजारांच्या संशोधनावर यापैकी १० टक्के रक्कमही खर्च केली जात नाही. म्हणून खऱ्या अर्थाने गरिबी दूर करायची असेल तर तंत्रज्ञान---संशोधन हे गरिबी आणि पर्यावरण यांच्याकडे वळविण्याचे आव्हान आज आपल्यापुढे आहे. ■■

(संदर्भ - " टेक्नोसोल्यूशन्स" या रॉबर्टो लेंटन व क्रिस्तन लेविस यांच्या, ऑक्टोबर २००० च्या 'डाऊन टू अर्थ' या नियतकालिकातील लेखाच्या आधारे.)

*'मोबाईल किंवा सेल्यूलर फोन' ही वस्तू आजच्या संगणक युगात अतिशय महत्त्वाची व उपयुक्त ठरली आहे. घरी-दारी कुठेही, केव्हाही, कुणाशीही संपर्क साधता आल्याने कामाच्या गतीला आणखी वेग आला आहे. विविध क्षेत्रांतील अनेक व्यक्ती या छोट्याशा, खिशात मावणाऱ्या यंत्रावर अक्षरश: अवलंबून आहेत, ही अतिशयोक्ती नव्हे तर वस्तुस्थिती आहे. अशा या मोबाईल फोनमधून होणाऱ्या किरणोत्सर्गामुळे (रेडिएशन) कॅन्सर होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणावर वाढत आहे, असे संशोधकांनी म्हटले आहे .त्यामुळे मोबाईल फोनच्या कंपन्यांना आता किरणोत्सर्गाची पातळी मोजावी लागणार आहे. या दुष्परिणामाबद्दल जगात अनेक देशांमध्ये पडसाद उमटले असून युरोपमध्ये प्रथम किरणोत्सर्गाची पातळी मोजण्याचे ठरविण्यात आले आहे. भारतातील मोबाईल फोनच्या कंपन्यांनाही आता ही पातळी मोजावी लागणार असून ग्राहकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये, यासाठी जागरूक राहावे लागणार आहे .तथापि ही किरणोत्सर्गाची पातळी फार कमी असून, त्यापासून कोणताही धोका नसल्याचे 'सेल्यूलर ऑपरेटर्स असोसिएशन ऑफ इंडिया' चे अध्यक्ष टी. व्ही. रामचंद्रन यांनी स्पष्ट केले आहे. विज्ञान हे शाप की वरदान ? हा चर्चेचा मुद्दा असला तरी विज्ञानाच्या किती आहारी जायचे हे ज्याने त्याने ठरवायचे आहे.*

(संदर्भ-'डाऊन टू अर्थ '१५ऑक्टोबर २०००)

# नव्या शतकातील नवी आव्हाने

स्त्रियांच्या विविध प्रश्नांबाबत, विविध माध्यमांतून अनेकवेळा चर्चा झाली आहे. अशा अनेक प्रकारच्या चर्चांमधून, सर्व प्रश्नांचा एक समान धागा शोधायचा झाला, तर तो 'स्त्रियांचे एकूण अधिकार' हाच असावा. अर्थात स्त्रीवर निसर्गत: असलेली मातृत्वाची जबाबदारी, शारीरिक रचनेमुळे तिला स्वीकारावे (?) लागलेले दुय्यम स्थान, रूढी-परंपरांमध्ये अडकलेली तिची व समाजाची मूल्ये, इतर कौटुंबिक जबाबदाऱ्या, तिची व तिच्या कुटुंबाची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थिती हे सर्व त्यात ओघाने आलेच. संपूर्ण जगात आर्थिक, सामाजिक परिस्थितीनुसार स्त्रियांच्या प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले तरी, तिथेही हाच धागा महत्त्वाचा आहे, असे आढळते. गेल्या दोन दशकात याच धाग्याच्या विविध बाजूंना प्रकाशात आणण्याचे प्रयत्न या विषयाच्या अभ्यासकांनी केले आहेत. यातील काही अभ्यासांमधून मांडण्यात आलेल्या विचारांच्या अनुषंगाने भविष्यातील आव्हानांचा वेध घेण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

**इतिहासाकडे दृष्टिक्षेप**

इतिहासात वसाहतवादाचे जे स्वरूप आढळते आणि ज्यातून शोषणकर्ता व शोषितवर्ग असे दोन गट तयार होतात, तसेच संबंध स्त्री व पुरूष यांच्यात प्रस्थापित झालेले आढळतात, असे काही अभ्यासकांचे मत आहे. काही प्रमाणात निसर्गामुळे व काही प्रमाणात पुरुषी वर्चस्वामुळे बहुतेक सर्व राष्ट्रांमध्ये स्त्री ही शोषित गटातच मोडली गेली व जाते. कुटुंबव्यवस्था जसजशी समाजात रुजली, तसतशी स्त्री अधिकच शोषित झाली. अर्थात त्याच कुटुंबव्यवस्थेचे संरक्षण व तिच्या स्त्री-सुलभ भावनांचे सहजपोषण त्यातून होत गेल्याने, अनेकदा तिला आपण शोषित आहोत हे जाणवले नसावे. किंबहुना ते 'शोषित असणे', हे अनेक स्त्रियांच्या दृष्टीने 'शोषित नसणे' असेही घडले. त्याच काळात कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे अर्थार्जनात स्त्रीचा थेट संबंध आला नाही.

आजचे 'इको-फेमिनिझम' वादी म्हणतात, त्याप्रमाणे शेतीसंबंधीची कामे किंवा वनसंपत्ती व तत्सम गोष्टींमध्ये स्त्रियांचा सहभाग असेलही, पण तो मर्यादित असावा. काही निर्णयप्रक्रियेत तिच्या पारंपरिक ज्ञानाचा उपयोग करून घेतला जात

असेल, तरी ती निर्णयप्रक्रियेत प्रमुख आहे, असे चित्र कदाचित समाजात फारसे पुढे आले नसावे.

एकोणिसाव्या व विसाव्या शतकात विज्ञानाचा, औपचारिक शिक्षणाचा प्रसार झाला. हे शिक्षण समाजधुरिणांनी स्त्रियांपर्यंत पोर्चावले. बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत, शिक्षणाचा उपयोग करून स्त्रिया अर्थार्जन करू लागल्या, आणि तेव्हापासून स्त्रियाच्या अधिकारांची चर्चा सुरू झाली. विसाव्या शतकाच्या मधल्या काळात त्याला वेग आला व या शतकसमाप्तीच्या टप्प्यावर स्त्रीच्या अनेक अधिकारांना कायद्याने व समाजाने मान्यता दिल्याचे आढळते.

**आजची स्थिती**

भारताचा विचार करता, आज स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने बहुतेक सर्व हक्क मिळलेले आहेत. राजकारणातील आरक्षणाचा मुद्दा वगळता स्त्रिया अनेक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. अर्थात काही टक्के स्त्रिया पुढे आल्या म्हणजे संपूर्ण समाज पुढे आला, असे समजणे योग्य नाही. प्रत्यक्षात नेमकी स्थिती काय आहे ? याचाही विचार केला पाहिजे.

जीवनातील सर्व क्षेत्रांचा पाया असणाऱ्या शिक्षणाचा विचार केला तर असे लक्षात येते की, भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरूष समानता मानून सर्वांना शिक्षणाचा हक्क दिलेला आहे. पण आजही भारतातील प्रौढांपैकी निम्मी जनता अशिक्षित आहे, आणि त्यात स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. तसेच प्राथमिक शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुला-मुलींची संख्या कोटींच्या घरात असून त्यातही मुलींची संख्या लक्षणीय आहे. शिक्षणाचा हक्क मिळाला पण शिक्षण सर्व स्त्रियांना, मुलींना मिळाले का ? या प्रश्नाचे उत्तर आजही नकारार्थी द्यावे लागावे, हे स्त्रियांच्या अधिकाराचा विचार करता खेदाचेच आहे. शहरी व निमशहरी भागातील काही टक्क्यांचे शिक्षण, म्हणजे सर्वांचे शिक्षण नव्हे. जीवनाला दिशा देणाऱ्या शिक्षणाची ही स्थिती तर इतर क्षेत्रात या स्त्रिया पुढे कशा येणार ?

कुटुंबातील समानता व अधिकार हे विषय तर संस्कृती, परंपरा, कौटुंबिक व सामाजिक मूल्ये याच्यांशी जोडले जातात. त्याचा पगडा इतका जबरदस्त आहे की खूपदा स्त्रियाच त्यातून बाहेर पडण्यास तयार होत नाहीत. स्त्रियांनी आपल्या अधिकारांचा विचार करणे म्हणजे "घर व कुटुंब तिच्यासाठी महत्त्वाचे नाही, असा विचार करणाऱ्या स्त्रियांवर शेवटी घर सोडण्याची वेळ येते," अशी विचारधारा आजही या समाजात आहे. त्यामुळे बहुतेकवेळा आपल्या अधिकारांचा संकोच करून, तर कधी आपल्यावर होणारा अन्याय

( मानसिक, लैंगिक, शारीरिक व शाब्दिक ) मान्य करून, स्त्रिया आपले आयुष्य रेटत असतात. आता नव्या शतकाकडे पावले टाकताना या परिस्थितीत थोडाथोडा बदल झालेला दिसतो आहे, पण संपूर्ण समाजातील स्त्रियांचा विचार करता, तो पुरेसा नाही.

**नवी आव्हाने**

भारताची सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन भावी काळात स्त्रियांना अनेक आघाड्यांवर ठामपणे उभे राहावे लागणार आहे, असे दिसते. सामाजिक व आर्थिक परिस्थितीनुरूप देशाचे व स्त्रियांच्या प्रश्नांचे आणि त्यांच्यासमोरील आव्हानांचे स्वरूप बदलत राहणार आहे. शहरी व निमशहरी भागातील स्त्रियांना आर्थिक उदारीकरणामुळे उद्‌भवलेल्या विविध आर्थिक, सामाजिक व कौटुंबिक प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे. संपूर्ण कुटुंबावर होणारे चंगळवादी संस्कृतीचे आक्रमण, औद्योगिकरणामुळे होणारे प्रदूषण व त्यामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या समस्या, स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी उद्योगांमधील कामगार कपातीसारखी धोरणे व त्यातच मंदीमुळे आलेले आर्थिक संकट यासारख्या प्रश्नांमध्ये शेवटी भरडली जाणार आहे ती स्त्रीच.

ग्रामीण भागातील स्त्रियांना देखील आर्थिक प्रश्नांना तोंड द्यावे लागणार आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात परकीय बी-बियाणे, जमिनीचा कस नष्ट करणारी रासायनिक खते, वृक्षतोडीमुळे होणाऱ्या हवामानातील बदलांचा ( विशेषत: पाऊस ) शेतीवर होणारा विपरीत परिणाम या सर्वांमुळे परंपरागत ग्रामीण अर्थव्यवस्था मुळापासून उखडली जाईल की काय अशी शंका निर्माण होण्यासारखी परिस्थिती उद्‌भवली आहे. तेव्हा या स्त्रियांसाठी तर ही अस्तित्वाची लढाई ठरणार आहे. अशी आव्हाने स्त्रियांना एक स्त्री म्हणून व एक जबाबदार नागरिक म्हणून जिद्दीने पेलायची आहेत. यावेळी त्यांच्या अधिकारांचा वापर त्यांना करावा लागणार आहे.

आतापर्यंत महिलांचे प्रश्न अशी वेगळी विभागणी होत गेली असली तरी भविष्यात मात्र स्त्रियांच्या प्रश्नांना असे वेगळे करून चालणार नाही. स्त्रिया या समाजातील अनेक घटकांपैकी एक महत्त्वपूर्ण घटक असल्याने त्यांचे प्रश्न हे एका अर्थाने समाजाचे प्रश्न आहेत, असे म्हणून त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न समाजाला व स्त्रियांना करायचा आहे. स्त्रियांना त्यांचे अधिकार मिळाले व त्यांनी ते मिळविले तरच नव्या शतकातील नव्या आव्हानांना भारतीय समाजाला सामोरे जाता येणार आहे. ■■

# खास खवैय्यांसाठी..........

●पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत आज जगात खाण्याच्या पद्धतींचे व पदार्थांचे जागतिकीकरण होताना दिसत असले तरी ही प्रक्रिया १४९२ सालापासून सुरू आहे. शेती व दूरचा प्रवास या दोन गोष्टी मानवाच्या हातात आल्या, तेव्हा प्रथम युरोपमधील व्यापाऱ्यांनी व जगाचा शोध घेण्यासाठी देशाबाहेर पडलेल्या संशोधक-पर्यटकांनी आपल्या प्रांतातील अन्नधान्य, फले, भाज्या व क्वचितप्रसंगी पाळीव प्राणी देखील आपल्याबरोबर नेले होते. जिथे जिथे ते फिरत तिथून त्या भागातील वैविध्यपूर्ण चवींचा खजिना ते आपल्याबरोबर इतरत्र घेऊन जात असत.

●आज जगात सर्वत्र 'हॉटेल संस्कृती' चे लोण आढळत असले तरी त्याची सुरूवात अठराव्या शतकाच्या मधल्या काळात फ्रान्समध्ये झाली. हॉटेल चालविणाऱ्यांना व हॉटेलमध्ये खाणाऱ्यांना वेगवेगळ्या चवींची आवश्यकता वाटल्याने अनेकविध चवींचा मिलाफ साधण्याचे प्रयत्न सुरू झाले. 'चेन रेस्टोरॉ' १९३० च्या दशकात सुरू झाली.

●आज संपूर्ण जगात 'अमेरिकन फूड' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पद्धतीचे जनकत्व सिल्व्हेस्टर ग्रॅहम या व्यक्तीकडे जाते. १८३० च्या दशकात त्याने आजच्या 'होल व्हीट ब्रेड' ची संकल्पना रूजविली. सामाजिक व औद्योगिक क्षेत्रात जसजसे बदल होत गेले, तसतसे खाण्या-पिण्याचे चक्रही बदलू लागले आणि 'केलॉग्ज' भावंडांनी सुरू केलेल्या 'केलॉग्ज' कंपनीप्रमाणे इतरही काही कंपन्या खाद्यपदार्थांच्या उत्पादनात उतरल्या.

●वृत्तपत्रे, मासिके व रेडिओ यांच्या प्रसाराबरोबरच, जाहितीचे युगही सुरू झाले आणि बघता-बघता त्यात खाण्या-पिण्याच्या विविध वस्तूंनी शिरकाव केला. चवींची विविधता, पदार्थ तयार करण्यास लागणारा कमी वेळ, त्यातच आरोग्याची घेतली जाणारी योग्य दखल यांमुळे हे नवे खाद्यपदार्थ समाजात चांगलेच रूळले. औद्योगिकरणामुळे व शहरीकरणामुळे जीवनाला आलेल्या वेगाला, हे पदार्थ तर वरदानच ठरले. विकसित राष्ट्रांमध्ये जे घडले, तेच थोड्याफार फरकाने विकसनशील राष्ट्रांच्या बाबतीतही घडले. हळूहळू लोक यांतूनही बाहेर पडून आरोग्याबद्दल आणखी जागरूक होऊ लागले, तेव्हा या

मोठ्या कंपन्यांनी तो मुद्दाही लक्षात घेतला, आणि जास्त आरोग्यदायी पदार्थांवर लक्ष केंद्रित केले. जाहिरातीतही हा मुद्दा अधोरेखित होऊ लागला. तरीदेखील वाढत्या लोकसंख्येला विविध प्रकारचे तयार पदार्थ व अन्नधान्य पुरविताना त्यात उत्पादनाचा दर्जा घसरतच गेला. मोठ्या प्रमाणावर खाद्यान्न बनविणाऱ्या कंपन्यांविरूद्ध पहिली प्रतिक्रिया १९६० मध्ये व्यक्त झाली. स्थानिक पद्धतींवर आक्रमण करणारी ही 'नवसंस्कृती' तेव्हाही अनेकांना रुचली नव्हती.

●विसाव्या शतकाअखेरीस तर 'अन्न' हेच मुळी वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. जननिक परिवर्तित (जेनेटिकली मॉडीफाईड) अन्नधान्याविरूद्ध युरोप व अमेरिकेत चर्चा चालू असून ते निसर्गाच्या नियमांविरूद्ध जाऊन तयार करण्यात आले आहे, असे म्हटले जात आहे.

●शतकांपूर्वी मानवाला शेतीचा शोध लागला, तेव्हा या प्रकारच्या अन्नधान्यावरून जगात कोणकोणते प्रश्न उद्‌भवू शकतात, याचा अंदाज त्याला आला नव्हता. उत्तम आरोग्यासाठी काय खावे व काय खाऊ नये याबाबत पूर्वी फारशी जागरुकता नव्हती. जे मिळेल ते, व जे चवीला चांगले वाटेल ते खाण्याकडे माणसाचा कल होता. आरोग्यविषयक तक्रारी वाढू लागल्या, शरीरविज्ञानाचे आकलन होऊ लागले, तेव्हा माणूस नावाचा प्राणी खाण्याबद्दल जागरुक झाला. आजसुद्धा अनेक देशांमध्ये आरोग्याचा विचार करुनच सर्व प्रकारचे खाणे ठरवून खाल्ले जाते असे नाही.

●अर्थात हा सर्व खाण्याचा इतिहास पाश्चात्य राष्ट्रांमधील आहे. भारतीय उपखंडात मात्र आरोग्यावर भर देऊन, नैसर्गिकरीत्या उपलब्ध होणाऱ्या फळभाज्या, कंदमुळे व इतर पदार्थ खाण्यावरच बहुतांश नागरिक अवलंबून होते, असे आढळते.

●व्यापार वाढल्याने जगात खाण्यापिण्याच्या पद्धती इकडच्या तिकडे व तिकडच्या इकडे पसरल्या. आता तर जागतिकीकरणाच्या लाटेत अनेक देशांमधील खास असे पदार्थ इतर देशांमध्ये मिळू लागले आहेत. तरीही जग एक होण्याच्या प्रक्रियेत देशोदेशींमधील चवींचे वैविध्य मात्र अद्याप तरी टिकून आहे.

●शेतीची सुरूवात होऊन चांगल्या अन्नाकडे मानवाची वाटचाल शतकांपासून चालू असली तरी तेव्हाही व आजही खऱ्या 'भुकेलेल्यांची भूक' जगाने भागविलेली नाही. जगातील कुपोषितांची संख्या शून्यावर आणता आलेली नाही. ■■

( संदर्भ - 'द केंब्रिज वर्ल्ड हिस्टरी ऑफ फूड ')

# शास्त्रशुद्ध बालशिक्षणाच्या प्रणेत्या

इटली देशातील रोम शहरात, तेथील एका झोपडपट्टीतील चाळीत एका मोठ्या खोलीत, जानेवारी १९०७ मध्ये डॉ.मारिया मॉन्टेसोरी यांनी आपले 'बालघर' सुरू केले. वास्तविक, या चाळींतील मुलांकडून होणारी नासधूस, उनाडक्या कमी व्हाव्यात व त्यांना काही वेळ तरी शाळेत जखडून ठेवावे, या उद्देशाने, शाळेच्या मालकाने शाळा सुरू केली होती, व त्यावर डॉ. मॉन्टेसोरींची नेमणूक केली होती.

परंतु, एक आव्हान म्हणून हे काम स्वीकारणाऱ्या मॉन्टेसोरीबाईंची दृष्टी वेगळी होती. हे काम स्वीकारण्यापूर्वी त्यांनी वैद्यकीय पदवी प्राप्त केली होती. अपंग, मंदबुद्धी, मंदगती मुलांच्या प्रश्नांवरील कामाचा अनुभव प्राप्त केला होता. बालकांचे निरीक्षण करण्याची स्वत:ला सवय लावून घेतली होती. रूसो, पेस्टॉलॉझी, फ्रोबेल यांच्या शैक्षणिक विचारांचीव प्रयोगांची माहिती करून घेतली होती. जीन इटार्डच्या अवेरॉनमधील रानटी मुलाला शिकविण्याच्या प्रयोगाचा अभ्यास केला होता: आणि फ्रेंच डॉक्टर एडवर्ड सेग्वीनच्या मंदबुद्धी मुलांसाठीच्या शैक्षणिक पद्धती व साधने आपलीशी केली होती. एवढेच नव्हे तर, तत्कालीन इटालीमधील पठडीबद्ध, बंदिस्त, मुलांना तासन्तास बाकांवर जखडून ठेवणाऱ्या प्राथमिक शाळांची दयनीय स्थितीही न्याहाळली होती. आणि मानववंशशास्त्रावर अध्यापनशास्त्राच्या दृष्टिकोणातून रोम विद्यापीठात भाषणेही दिली होती. या साऱ्या संचितातून त्यांना कळले होते ते असे की, कोणत्याही तऱ्हेच्या शारीरिक, मानसिक अथवा सामाजिक-सांस्कृतिक प्रश्न असलेल्या मुलांना गरज आहे ती 'उपचारां 'ची नव्हे तर 'शिक्षणा' ची ! बालकांच्या शिक्षणाच्या बाबतीत जाणवलेले हे तत्त्व व्यवहारात तावून सुलाखून पाहण्याची एक संधीच, मॉन्टेसोरीबाईंना, या निमित्ताने लाभली.

या बालघरात, तीन ते सात या वयोगटातील साठ मुले जमा झाली होती. या वयाच्या बालकांवर काही शैक्षणिक संस्कार करणे हे एक जबरदस्त आव्हान होते. कारण, " ही छोट्या घरांतील, झोपड्यांमधील साठ मुले. त्यांना कोणी त्राता नाही, वाली नाही. त्यांच्या चेहऱ्यावर भाव तर कसलेच दिसत नव्हते. भयभीत

झालेले डोळे - कारण आयुष्यात त्यांनी काहीच पाहिले नव्हते. डोळ्यात अश्रू, चेहऱ्यावर भीती आणि त्यामुळेच ती मुले मूक होती. त्यांना बोलके करणे जवळजवळ अशक्य होते." परंतु मॉन्टेसोरी या चिंतनशील व प्रयोगशील शिक्षिका होत्या. त्यामुळे मुलांमध्येच अल्पावधीतच लक्षणीय बदल त्या घडवू शकल्या. इतकेच नव्हे तर त्यांनी, येथील आपल्या अनुभवांचे सामान्यीकरण करून त्यावरचा 'सायंटिफिक पेडॅगॉजी ॲज अप्लाईड टू चाईल्ड एज्युकेशन इन दि चिल्ड्रेन्स हाऊसेस' हा आपला ग्रंथही १९०९ मध्ये प्रसिद्ध केला.

केवळ चार-पाच वर्षांच्या अवधीतच या शाळेची कीर्ती, देशाच्या सीमा ओलांडून, युरोप-अमेरिकेत पसरली. इटाली व स्वित्झर्लंडमध्ये या धर्तीवर अनेक शाळा चालू लागल्या. तत्कालीन विद्वानांच्यात मॉन्टेसोरींचे प्रयोग व शिक्षणपद्धती यांची चर्चा होऊ लागली. अनेक थोरा-मोठ्यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन, प्रयोग जवळून पाहिला. अनेकांना या प्रयोगात संपूर्ण शैक्षणिक परिवर्तनाचीच बीजे आढळून आली. युरोपपेक्षाही अमेरिकेत मॉन्टेसोरींच्या विचारांचा झंझावात अधिक वेगाने पसरला. १९११ ते १९१५ या केवळ पाच वर्षात मॉन्टेसोरींवर दोनशेपेक्षाही अधिक प्रकाशने निघाली. पुढे काही काळ हा भर ओसरला असला तरी १९६० नंतर पुन्हा एकदा मॉन्टेसोरींचे विचार अमेरिकेतील लोक आपलेसे करू लागले आहेत. अमेरिकेच्या पाठोपाठ सर्व युरोपमध्ये आणि जगातील इतरही भागांतून मॉन्टेसोरींच्या प्रयोगांचा नि त्यावरील लेखनाचा बोलबाला होऊ लागला.

भारतातही, १९१२ च्या सुमारास प्रसिद्ध झालेल्या मॉन्टेसोरींच्या पुस्तकांच्या इंग्रजी भाषांतरावरील परीक्षणे, येथील इंग्रजी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली, व त्यांनी काही शिक्षणप्रेमींना या पुस्तकांकडे वळविले. अमीन, गिजुभाई बधेका, सरलादेवी साराभाई, अशी काही मंडळी मॉन्टेसोरींच्या 'नवशिक्षणा'मुळे बालशिक्षणाकडे ओढली गेली, हे आपल्याला माहितच आहे.

मॉन्टेसोरींनी पहिले बालघर काढले, त्यालाही आता ९३ वर्षे झाली, तसेच त्यांच्या पहिल्या ग्रंथाला ९१ वर्षे उलटून गेली. यानंतरही त्यांची अनेक पुस्तके एकापाठोपाठ प्रसिद्ध झाली. उदाहरणार्थ, द सिक्रेट ऑफ चाईल्डहूड, द अबसॉरबंट माईंड, एज्युकेशन फॉर अ न्यू वर्ल्ड, एज्युकेटिंग द ह्युमन पोटेंशियल आणि सायको-अरिथमॅटिक, सायकोजिऑमेट्री. त्यांमधून त्यांनी केवळ आपले प्रयोग, त्यांचे निष्कर्ष, किंवा आपले अनुभवच मांडले नाहीत तर त्यांतून शिक्षणविषयक-बालशिक्षणविषयक नवे विचार मांडले. या विचारांना

मानसशास्त्रीय आधार पुरविला आणि नवे सिद्धांतनही केले. या सर्व ग्रंथांचा केंद्रबिंदू 'मूल' हाच आहे. सहा-सात वर्षांपर्यंतचे बालक समजावून घेण्याचा नि समजावून देण्याचा प्रयत्न या ग्रंथांतून केलेला आहे. तसेच बालकाची प्रज्ञा, जिज्ञासा, स्वयंशिक्षणाची उपजत क्षमता, त्यासाठी मुलाला असणारे पूर्ण स्वातंत्र्य, त्यासाठी जाणीवपूर्वक करावयाची वातावरणनिर्मिती आणि इतर कुठल्याही वयात नाही इतके या वयात, शिक्षकाने बालकाच्या विकासास सहाय्यभूत होण्याची गरज, हा सर्व या ग्रंथांमधील विचारांचा गाभा आहे.

डॉ. मॉन्टेसोरी या बालकांविषयी आणि बालकांच्या शिक्षणाविषयी, तत्कालीन जगताला पूर्णतः नवीन असणारे विचार जरी मांडत होत्या, तरीही त्या फक्त बालकांविषयी बोलत नव्हत्या. त्याच्या केवळ बालवयातील शिक्षणाविषयी बोलत नव्हत्या, की शैक्षणिक साधने नि पद्धतींविषयी बोलत नव्हत्या. त्या सदैव बोलत होत्या ते मानवी जीवनाबद्दल, मातेच्या उदरात असल्यापासून विकसित होत जाणाऱ्या 'चैतन्या 'बद्दल. म्हणूनच त्या म्हणतात, "बालकाचे कार्य असते ते आपल्यातून, आजूबाजूच्या वातावरणाला, काळाला, स्थानाला नि संस्कृतीला साजेसा असा पूर्ण मनुष्य घडविण्याचे," बालकाच्या या कार्याला योग्य वेळी, योग्य पद्धतीने हातभार लावणे म्हणजे बालकाचे शिक्षण, अशी त्यांची शिक्षणाविषयीची धारणा होती.

आपल्या 'ॲबसॉरबंट माईंड' या ग्रंथात डॉ. मॉन्टेसोरी म्हणतात, "बालकाजवळ स्वतःचे स्वतःच आकलन करून घेणारे मन असते, याचा जेव्हा सुगावा लागला तेव्हा शिक्षणात क्रांती घडून आली. आता आपल्याला हे सहजपणे समजू शकते की, ज्या वयात बालकाचे व्यक्तिमत्व आकार घेत असते असा सुरुवातीचा काळ, सगळ्यात जास्त महत्त्वाचा का असतो. या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही वयात, बालकाला, इतक्या जाणीवपूर्वक सहाय्याची गरज नसते. आणि आपण त्याला सहाय्य करायचे असते ते, हा एक निःशक्त, दुबळा जीव आहे म्हणून नव्हे, तर उपजतच त्याला विलक्षण अशी निर्मितीक्षमता लाभली आहे म्हणून जेव्हा आपल्याला हे कळून येईल की अगदी लहान वयातील बालकाला आपल्यापेक्षा वेगळे मन प्राप्त झले आहे, आपण केवळ तोंडी सूचना देऊन त्या मनापर्यंत पोचू शकणार नाही किंवा अजाणतेपणापासून जाणतेपणाकडे प्रवास करणाऱ्या त्या मनापर्यंत आपण प्रत्यक्षपणे पोचू शकणार नाही, तेव्हा साहजिकच शिक्षणाविषयीची संपूर्ण संकल्पनाच बदलून जाते..... "आपल्या 'सायंटिफिक पेडॅगॉजी' या ग्रंथात मादाम मॉन्टेसोरींनी म्हणून ठेवले आहे की, "बालकाच्या,

अगदी लहान वयातील शिकण्याचा हेतू, त्याची शाळेसाठी तयारी करून घ्यायची असा नसून त्याला त्याच्या जीवनभरासाठी तयार करणे हा आहे. "ही जीवनभराची तयारी होण्यासाठी, अर्थातच, बालकाला, कोणत्याही मनुष्याला असावा असा, स्वतंत्रतेचा हक्क असायला हवा, असेच डॉ. मॉन्टेसोरींचे प्रतिपादन आहे.

मॉन्टेसोरींचा १९०९ साली प्रसिद्ध झालेला, ' सायंटिफिक पेडॅगॉजी....' हा ग्रंथ तत्कालीन पारंपरिक शिक्षणाला व तत्संबंधीच्या पारंपरिक विचारांना धक्का देणारा असा होता. या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर 'द मॉन्टेसोरी मेथड' या नावाने १९१२ साली प्रसिद्ध झाले.मॉन्टेसोरींनी आपल्या नवीन शैक्षणिक तंत्रांच्या व साधनांच्या मागे असलेल्या भूमिकेची सैद्धांतिक मांडणी, या ग्रंथात केली. आपल्या स्वतःच्याच अनुभवांतून आणि प्रयत्नांतून शिकण्यासाठी बालकाला स्वातंत्र्य असायला हवे, आणि असे बालकाचे स्वातंत्र्य अबाधित राखणे व त्याला काही विशिष्ट दिशेने 'कार्य' पुरवणे ही प्रौढांची जबाबदारी आहे, असे त्यांचे तार्किक विवेचन आहे. स्वतःच्या हालचालींतून, शैक्षणिक साधनांच्या सहाय्याने नि आपल्या पंचेंद्रियांच्याकरवी, बालक, विशिष्ट शिस्तीने आपल्या तार्किक विचारांची बैठक पक्की करीत असते, नि मग हाच बालकाच्या पुढील औपचारिक शिक्षणाचा पाया ठरतो. हे तात्त्विक विवेचन, शिक्षणाच्या क्षेत्रात खळबळ उडवून देणारे असेच होते.

'द मॉन्टेसोरी मेथड' या पुस्तकाची एक नवी आवृत्ती १९६४ साली अमेरिकेत प्रसिद्ध झाली. त्यावेळी इलिनॉईस विद्यापीठात असलेले मानसशास्त्राचे प्राध्यापक जे. मॅकवी हंट यांची, एक सविस्तर अशी प्रस्तावना या ग्रंथाला आहे. त्यात, मॉन्टेसोरींच्या या ग्रंथाला अर्धशतक ओलांडल्यानंतरही नेमके काय महत्त्व आहे, आणि मध्यंतरीच्या काळातील मानसशास्त्राच्या व अन्य शास्त्रांतील संशोधनाच्या विकासानंतरही, या ग्रंथाकडे का वळायला हवे याचे विवेचन केले आहे. त्यांच्या मते, एक असे की, मॉन्टेसोरीबाईंनी विकसित केलेल्या शैक्षणिक साधनांवर खेळत असताना, बालकाचे अवलोकन करणे,व त्यावरून बालकाच्या मानसिक विकासासाठी शैक्षणिक परिस्थितीत कशा प्रकारचा बदल करायला हवा, याचा शोध घेणे, या गोष्टीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मॉन्टेसोरीबाईंचा तो एक मूलभूत स्वरूपाचा शोध आहे. दुसरा फायदा असा की, आजच्या शैक्षणिक परिस्थितीतील प्रश्नांना भिडणारी बालशिक्षणाची एक पद्धतीच त्यातून विकसित झाली आहे. एकदम पहिलीत औपचारिक शिक्षणाला सुरूवात

होण्यापूर्वी त्यांच्या शैक्षणिक पूर्वतयारीच्या क्षमता विकासाच्या संधी, बालकाला अशा बालशाळेपासून उपलब्ध होतात. विशेषत: मागास समाजातील मुलांना अशा संधी मिळण्याचे महत्त्व अनिवार्य आहे. आपल्या देशातील ग्रामीण भागातील बहुसंख्य मुलांच्या बाबतीत, मॉन्टेसोरींचे बालशिक्षणविषयक विचार व शैक्षणिक साधने यांचा उपयोग, त्यांना इतर प्रगत मुलांच्या बरोबरीत आणण्यास उपयुक्त ठरणारा आहे.

जे.मॅकवी हंट यांनी मॉन्टेसोरींचे हे महत्त्व सांगूनही सुमारे चाळीस वर्षे उलटली आहेत. हाच मूलभूत विचार घेऊन जगात बालशिक्षणाच्या बाबतीत शास्त्रीय दृष्टिकोणातून खूपच कार्य झाले आहे. आपल्या देशातही शास्त्रीय बालशिक्षणाचे नमुने विकसीत झाले आहेत. याच वर्षी ज्याला पंचाहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत, त्या नूतन बाल शिक्षणसंघाने (मूळचे नाव मॉन्टेसोरी संघ) या बाबतीत प्रयोग आणि प्रसार यांच्या सहाय्याने बालशिक्षणाला भारतीय शैक्षणिक व्यवहारात मध्यवर्ती स्थान प्राप्त करून दिले आहे. आजही मॉन्टेसोरी कालसुसंगत अशी आहे.

नव्या शतकातही मॉंटेसोरींच्या वैचारिक पायावरच बालशिक्षणाची उंच इमारत उभी राहणार आहे, यात शंका नाही.

■■

*मुलांच्या शिक्षणाची दिशा कशी असावी ह्याबद्दल सर्व राष्ट्रांत एकमत आहे. ती अशी असावी की ज्यामुळे - (१) मुलाची शारीरिक व मानसिक शक्ति, त्याचे सुप्त गुण, त्याचे व्यक्तिमत्व ह्याचा विकास व्हावा. (२) शांतता, सहिष्णुता, एकता, समता, मानवाचे हक्क व त्याचे स्वातंत्र्य ह्याबद्दल आदर, व इत्यादींबद्दल सर्व राष्ट्रांनी संमत केलेल्या तत्वांबद्दल मुलाच्या मनात आदर वाढीला लागावा. (३) आपले आईवडील, संस्कृती, भाषा, राष्ट्रीय मूल्ये आणि आपल्याहून निराळे असलेले समाज, संस्कृती ह्याबद्दल आदरभाव निर्माण व्हावा. (४) स्वतंत्र समाजात जबाबदार नागरिक महणून जगता यावे व सर्व धर्माच्या, राष्ट्राच्या लोकांशी मैत्रीचे संबंध ठेवता यावे. (५) नैसर्गिक पर्यावरणाबद्दल मुलांना प्रेम व आदर वाटावा.*

*(संदर्भ - 'बालकाचे हक्क ' युनिसेफ (भारत) ह्यांनी प्रसिद्ध केलेल्या 'राईट्स ऑफ द चाईल्ड ' ह्या पुस्तिकेचा स्वैर अनुवाद - डॉ. शांता वैद्य.)*

# समता हाच शांततेचा पाया !

*[ 'द गुड अर्थ ' या जगप्रसिद्ध कादंबरीच्या लेखिका पर्ल बक यांना १९३८ साली नोबेल पारितोषिक प्राप्त झाले. त्यांच्या एकूण वाङ्मयीन कर्तबगारीसाठी मिळालेला तो सन्मान होता. नोबेल पारितोषिकाच्या सन्मान पत्रात ज्याचा खास करून उल्लेख केला गेला, तो चिनी शेतकऱ्याच्या जीवनचित्रणाचा. ते ज्या ग्रंथात आले आहे, त्या १९४५ सालच्या जेम्स येन यांच्या विकासविषयक कार्यावरील 'टेल द पीपल ' या पुस्तकाची छोटीशी प्रस्तावना ( शेवटचा परिच्छेद गाळून ) येथे देत आहोत. संपूर्ण जगात एकप्रकारची अस्वस्थता असताना त्यांचे हे विचार आजही तेवढेच कालसुसंगत व महत्त्वाचे आहेत. - संपादक]*

युद्ध आणि शांतता या दरम्यानच्या ज्या काळात आपण राहत आहोत त्यात लहान अथवा स्थानिक गोष्टींना काहीच महत्त्व उरलेले नाही. जे काही आपल्या विचारात येईल, जे काही कृतीत उतरेल त्याचे मोजमाप ठरणार आहे ते त्यांची जगाच्या दृष्टीने काय किंमत आहे यावरून. युद्धाने राष्ट्रांना -अगदी दोस्त राष्ट्रांनाही जवळ आणलेले नाही, उलट राष्ट्राराष्ट्रांत फळयाच पडताहेत. मात्र सारे जग एक झाले आहे ते एकाच गरजेपोटी - शांततेसाठी. सर्वच देशांना शांतता हवी आहे, जगण्यासाठी.

पण अशी शांतता तरी किती काळ टिकू शकेल ? एखादे यंत्र बनवावे, एखादा व्यवसाय थाटावा किंवा अगदी युद्ध निर्माण करावे, तशी काही शांतता तयार करता येणार नाही. इतर अनेक गोष्टींवर शांतता अवलंबून असते. जगात समता आणि सार्वत्रिक सुरक्षितता अवतरली तरच जगात शांतता नांदू शकेल. एरवी, ज्यांवर, सर्व शक्ती-बुद्धीनिशी दिवसरात्र लोक खपताहेत त्या शांततेच्या योजना निरर्थकच आहेत. आपण विचार करायला हवाय, आपण योजना आखायला हव्यात त्या जगातील भूक, अज्ञान आणि दमन दूर करण्याच्या. लोक समाधानी असतील तेव्हाच जगात शांतता नांदेल. जेव्हा लोक अज्ञानाने, भूकेने नि वाईट शासनाच्या दबावाखाली घुसमटलेले असतील, तेव्हा 'समाधान' असणार नाही आणि 'शांतताही.' त्याच्या कारणाच्या खोलात न जाता केवळ 'शांततेसाठी शांतता' प्रस्थापित करण्याचा आपण प्रयत्न करणार असू, तर ते

कृत्य म्हणजे या वेडगळ जगातील सर्वात मोठा मूर्खपणा ठरेल. आज जगातील तीन-चतुर्थांश जनता अडाणी, कुपोषित, रोगराईला तोंड देणारी आणि दमनकारी शासनाधीन आहे. त्यामुळे प्रथमतः योजना त्यांच्यासाठी तयार व्हायला हव्यात. त्यांचे शिक्षण कसे होईल, त्यांना निरोगी कसे होता येईल, त्यांचे पोट कसे भरेल, ते माहितीने कसे परिपूर्ण होतील आणि स्वयंशासन कसे प्राप्त करतील ? यासाठी योजना झाल्याविना आपले शांततेचे बोलणे निरर्थक होय. अशी कोणती योजना आहे का की जी एका पिढीच्या अवधीतच जगातील लाखो लोकांच्या जीवनात परिवर्तन करू शकेल ? शिक्षणाच्या दीर्घ प्रक्रियेकरवी असा बदल घडवून आणावा तर आपल्याला तेवढी सवड नाही. पुनर्उभारणीच्या प्रयत्नांतूनच शिक्षण घडून आले पाहिजे. कृती करता करताच लोकांचे शिक्षण झाले पाहिजे. शाळेत शिकता शिकता राष्ट्रउभारणीही केली पाहिजे.

इथं अशी योजना गेली पंचवीस वर्षे कार्यान्वित होताना दिसतेय. जग ज्या प्रश्नाला तोंड देतेय्, त्याच्याकरिता जाणीवपूर्वक प्रयत्न होताना दिसतोय. एका चिनी माणसाने चीनसाठीच अशी योजना तयार केली आहे. पंचवीस वर्षांपूर्वी जेम्स येन आणि त्याच्या सहकाऱ्यांना चीनचा नेमका प्रश्न काय आहे ते उमगले. तीन-चतुर्थांश जनता अडाणी, रोगराईत खितपत पडलेली आणि कुशासित अशी दिसली. त्यांनी स्वतःलाच विचारले: एका पिढीतच यात कशाने परिवर्तन घडून येईल ? स्वतःच्या या प्रश्नाचा त्यांनी शोध घ्यायला सुरूवात केली. त्यांच्या कार्यपूर्तीपूर्वीच युद्धाचा डोंब उसळला: परंतु त्यांची योजना तयार झाली होती आणि ती प्रत्यक्षात तावून सुलाखून निघाली होती. आता त्यांची योजना तयार आहे. केवळ चीनसाठीच नव्हे तर सर्वच ठिकाणच्या जनतेसाठी. अमेरिकेच्या दक्षिण विभागाला तर ती मौल्यवान ठरेलच पण दक्षिण अमेरिकेतील काही भागांतून, क्युबामध्ये, प्युरिटेरिकोमध्ये आणि कदाचित आफ्रिका, भारत, दक्षिणपूर्व आशियातील देश आणि जिथे जिथे लोक कुपोषित आहेत, अडाणी आणि कुशासित आहेत, अशा सर्वच ठिकाणी ती उपयोगी पडेल.

पण एक सावधगिरीची सूचनाही देऊन ठेवते, ही योजना राबवू पाहणारी, खाजगी व्यक्ती असो अथवा सरकार असो, त्यांच्यात त्या चिनी तरूणांच्या हृदयात वसलेली श्रद्धा नसेल तर, काहीच होणार नाही.

ही श्रद्धा आहे ती, अगदी सामान्यातील सामान्यालाही अन्न, आरोग्य, उपजीविकेचे साधन आणि चांगले शासन मिळाले पाहिजे, यावर असलेली श्रद्धा. मनुष्यमात्रांविषयीचा आदर हा कुठल्याही शांतता योजनेचा गाभा आहे.

आज जो काही बराचसा विचार होतोय, विशेषत: पाश्चात्य देशांमधून, त्यातून हा गाभा गळून पडण्याचाच धोका मला जाणवतोय. त्यांचे सद्‌हेतू नि बुद्धी यांच्याविषयी पूर्ण आदर बाळगूनही मी असेच म्हणेन, की आज जे काही नियोजन जगात केले जाते, ते लोकांच्या गरजा काय आहेत असे त्यांना वाटते, त्याच्या आधारे केले जात आहे, लोकांना काय हवे आहे याचा शोध घेऊन केले जात नाही. लोकांच्या हितासाठी केलेला नि तरीही लोकांवर लादलेला कार्यक्रम, लोकांना नेमके काय हवे आहे, हे विचारल्याशिवाय यशस्वी होण्याची शक्यता नाही. सक्ती मग ती सद्‌हेतूंनी जरी केली असली तरी ती शांततेची अपेक्षा पुरी करणार नाही. जर लोकांना, त्यांच्या अडाणीपणामुळे, जे त्यांच्या हिताचे नाही तेच हवेसे वाटत असेल तर लोकांना गरज आहे ती शिक्षणाची. सक्तीची नव्हे.

■■

*श्रद्धा बळकट करणारी नीटपणे चालविलेली प्रक्रिया असेल तर ती अनेक गोष्टी घडवून आणत असते. तिचं मुख्य सावज असतं ते म्हणजे 'मूर्ख नि अडाणी जनता.' ती तशीच राहावी, वंचित नि एकाकी. प्रत्येकजण एकटाच टी. व्ही. समोर बसून त्यावरील खेळ, कथा किंवा गुळगुळीत कार्यक्रम पाहात राहावा, म्हणजे मग अशा साधनवंचित माणसांना संघटित करून, त्याच्याचसारखे इतर काय विचार करतात, कशाप्रकारे परस्पर विनिमयावर भिस्त ठेवून, आपले आपण, आपल्यासंबंधित उपक्रम आयोजित करून ते यशस्वी करून दाखवितात, त्यांच्या माहितीपर्यंत तो पोचणारच नाही. अशी कोट्यवधी दुर्दैवी माणसे हाच, सार्वत्रिक संपर्क माध्यमांचा आणि आज्ञाधारकपणा व आवश्यक त्या कौशल्यांचे- त्यात वेळोवेळी राष्ट्रप्रेमाच्या घोषणा देण्याचेही कसब आले- प्रशिक्षण देणाऱ्या सरकारी शिक्षण व्यवस्थेचा, अंगुलिनिर्देश केलेला वर्ग असतो.*

*-- नोम चॉम्स्की*

## अर्थबोधपत्रिकेचे सभासद होण्यासाठी करावयाचा अर्ज

दिनांक :

संपादक, 'अर्थबोधपत्रिका',
भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,
'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

सस्नेह नमस्कार,

मला/आमच्या संस्थेला अर्थबोधपत्रिकेचे सभासद म्हणून अंक क्रमांक ———पासून नोंदवून घ्यावे. पुढील सहा अंकांचे देणगीमूल्य रूपये ५०/- (रु. पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्ट/चेक/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डरने / रोख पाठविण्यात येत आहे. ड्राफ्टचा तपशील पुढील प्रमाणे :

**(फक्त पुण्याच्या बँकेवरील चेक पाठवावेत.)** ————————

अंक पाठविण्यासाठी नाव व पत्ता : ————————

संबंधित संस्थेचे नाव व पत्ता : ————————

सही

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीतर्फे विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित केली जातात. अशा चर्चासत्रात सहभागी होण्याच्या दृष्टीने आपल्या आवडीचे विषय ————————

# सूचना

- चेक / ड्राफ्ट 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी, पुणे' या नावाने पाठवावेत. **पुण्याच्या बँकेवरीलच चेक मान्य करण्यात येतील.**
- देणगीमूल्य व्यक्ती, संस्था, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये या सर्वांसाठी एकच आहे.
- या नमुना अर्जाच्या झेरॉक्स प्रती किंवा हस्तलिखित प्रतीद्वारे आपण देणगीमूल्य पाठवू शकता.
- आपल्या परिचितांमध्ये अशा प्रती वाटून किंवा आम्हाला त्यांचे पत्ते कळवून आपण, हा अंक अनेक वाचकांपर्यंत पोचविण्यास सहाय्य करू शकता.

**'अर्थबोधपत्रिका' विनामूल्य मिळविण्याची योजना**

अर्थबोधपत्रिकेचे उद्दिष्ट व लेखांचे स्वरूप आपल्याला आवडले असेल तर आपण आम्हाला वाचकवृद्धीसाठी मदत करावी, अशी विनंती करीत आहोत. वाचकवृद्धीच्या या योजनेतून आपल्याला एका वर्षभरातील अंक विनामूल्य मिळू शकतील. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

- या योजनेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीस एकावेळी कमीत कमी पाच नवीन देणगीदार मिळवून द्यावे लागतील.
- अशी जमा केलेली देणगीमूल्याची रक्कम (कमीत कमी रु. २५०/-) एकत्रितपणे देणगीदारांच्या सभासदत्वाच्या अर्जासहित रोख, डिमांड ड्राफ्ट किंवा मनिऑर्डरने आमच्याकडे पाठवावी लागेल. (या योजनेखाली चेकने रक्कम स्विकारली जाणार नाही)
- अशा रितीने देणगीमूल्य देणारे कमीत कमी पांच नवीन सभासद मिळवून देणारांस 'अर्थबोध' पत्रिकेचे पुढील सहा अंक विनामूल्य पाठविले जातील.
- ही योजना अल्पकाळापुरतीच मर्यादित असून पुरेशी सभासद नोंदणी झाल्यावर कोणतीही पूर्वसूचना न देता ती बंद करण्यात येईल.

All we are saying is , Give peace a chance !

*आमचे एवढेच म्हणणे आहे*
*शांतीलाही संधी द्या!*
*खळाळत्या झऱ्याला*
*तारूण्याच्या रक्ताला*
*अनिर्बंध वाहू द्या!*
*आमचे एवढेच म्हणणे आहे*
*शांतीलाही संधी द्या!*
*शस्त्रे तुमची म्यान करा*
*ओठ तुमचे आवळून धरा*
*नको शस्त्र, नको शब्द....*
*राजकारणाचा उबग-फुगा*
*फुटायचा आहे उद्या!*
*आमचे एवढेच म्हणणे आहे*
*शांतीलाही संधी द्या!*
*जाळणे नव्हे, जळत जगणे*
*हा आमचा धर्म आहे*
*हिंसा-अनिती तुमच्या पुरती*
*त्यांचा वारसा ठेवू नका*
*आमचे आम्हा पेरू द्या!*
*आमचे एवढेच म्हणणे आहे*
*शांतीलाही संधी द्या!*
*निसर्गाच्या या अंशाला*
*विश्वाच्या या प्रेमाला*
*एकजीव होऊ द्या!*
*आमचे एवढेच म्हणणे आहे*
*शांतीलाही संधी द्या!*

■■

*(बीटल्सपैकी एक जॉन लेनन याने व्हिएतनामचे युद्ध आणि एकूणच युद्धांच्या समाप्तीसाठी दिलेली हाक)*

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना :**

- 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे :**

- भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे;
- अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे;
- इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम :**

- संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते.
- संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.
- अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.
- नोव्हेंबर १९९८ पासून अर्थबोधपत्रिका प्रकाशित केली जात आहे.


## - संस्थेचे मंडळ -

स. वा. कोगेकर • मृणालदत्त चौधरी • कुमुदिनी दांडेकर
आनंद नाडकर्णी • मनोहर भिडे • नीळकंठ रथ • के. एन्. राज
व्ही. एम्. राव • दि. चं. वधवा • सु. म. विद्वांस
ए. वैद्यनाथन • सत्यरंजन साठे • रामदास होनावर

# अर्थबोध पुरवणी

*[ महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाची वस्तुस्थिती दर्शविणारा श्री.राजीव तांबे यांचा एक लेख महाराष्ट्र टाईम्सच्या २२ ऑक्टोबर २०००च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. अर्थबोधपत्रिकेच्या वाचकांसाठी हा लेख पाठवीत आहोत.]*

## प्राथमिक शिक्षणातील १९ आणि १०९

**महाराष्ट्रातल्या** दोन जिल्ह्यांची ही गोष्ट. प्राथमिक शिक्षणाची गोष्ट. जिल्हा परिषद शाळांची, नगर परिषद शाळांची गोष्ट. संपूर्ण सत्य, प्रातिनिधिक गोष्ट. 'जिथे एकोणीस आहेत, तिथे एकशेनऊ असतातच,' असं अंतिम सत्य दाखविणारी गोष्ट. आपण प्रयत्नशील राहिलो तर, एकशेनऊंची संख्या वाढू शकते, हे अनुभवल्याची, म्हणूनच आशावाद जागविणारी गोष्ट !

पण हे 'एकोणीस' आणि 'एकशेनऊ' प्रकरण काय आहे ?

### ९८१/९ = १९ (?)

नगर परिषद शाळा क्रमांक दोन. माझ्या सोबत उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. आनंदराव पाटीलही आहेत. इयत्ता चौथीच्या वर्गातील मुलांना एक गणित सोडवायला दिले, 'नऊशेएक्याऐंशी भागिले नऊ' ! वर्गातील सर्वच्या सर्व मुलांचे उत्तर आले, 'एकोणीस' !

वर्गात उपस्थित मुले पंचेचाळीस. काही मुले चुकू शकतील, पण सर्व वर्गच, एखादे गणित आत्मविश्वासपूर्वक चुकीचे करतो आहे, तेव्हा शिक्षकांतच काही तरी पाणी मुरते आहे, असा संशय आला. सर्व मुलांनी आपापल्या पाट्या, वह्या आम्हाला दाखविल्या. आम्ही त्या वह्या, पाट्या त्या शिक्षकांना दाखविल्या. सर्व मुलांनी पटकन् गणित .डविल्याबद्दल शिक्षकांचा चेहरा फुलला होता ! मुले म्हणाली, 'गुरुजी आणखी एक गणित घाला.' शिक्षकांनी पण प्रेमळ आग्रह धरला. आम्ही (खिन्नपणे ) हसून शिक्षकांनाच विनंती केली की, 'त्यांनीच हे गणित फळ्यावर सोडवून दाखवावे !' शिक्षक फळ्यावर गणित सोडवू लागले. शिक्षक तरुण होते. तीन वर्षांपूर्वीच ते डी. एड्. झाले होते. त्यांचं हस्ताक्षर सुंदर होतं. नऊशेएक्याऐंशी भागिले नऊ या गणिताचे फळ्यावरील उत्तर (पण) एकोणीस !!

मी आणि पाटील अवाक् झालो ! शिक्षकांना ऑफिसमध्ये बोलावलं. अर्धा-पाऊण तास खर्च केल्यावर, शिक्षक एकोणीसपासून एकशेनऊपर्यंत आले ! ते हसून म्हणाले, "माझा थोडासा घोटाळा झाला होता. पण आता कळतंय." वर्गातील सर्व मुलांना एकशेनऊपर्यंत आणण्याचे आश्वासन त्यांच्याकडून मिळवलं. पुन्हा आठ दिवसांनी भेटायचं ठरलं.

तिथून जवळच पाच कि.मी. अंतरावर एक जिल्हा परिषद शाळा आहे. आम्ही

त्या शाळेकडे निघालो. तालुक्याचे गाव. प्रशस्त शाळा. वर्गातील भिंती सुशोभित. शिक्षण विभागाची जीप शाळेच्या आवारात येताच शिक्षकांची धावपळ झाली. वर्गात टेबलावर डस्टर किंवा पट्टी किंवा छोटी छडी आपटल्याचे ऐकू आले. शाळेत भयावह शांतता पसरली ! शाळेतल्या (अनुभवी) शिपायाने ड्रायव्हरला गाठून आवश्यक ती माहिती गोळा केली आणि तो 'च्या बिस्कीट' आणायला निघून गेला. आम्ही तडक चौथीच्या वर्गात गेलो. 'नऊशेएक्याऐंशी भागिले नऊ,' 'सोडवा गणित !' शिक्षक वयस्क. आता दोन महिन्यांनी ते सेवानिवृत्त होणार. भाषा, गणित हे त्यांचे आवडीचे विषय. 'आता पूर्वीसारखं राहिलं नाही. आता सारखी पाठ्यपुस्तकं बदलतात. त्यामुळे मुलांचा (की त्यांचा ?) गोंधळ होतो.' शिक्षकांनी तोंडीच उत्तर सांगितलं, 'एकोणीस' ! आता मुलांच्या वह्या तपासण्याची गरज नव्हती (च). तरी पण सदतीस मुलांपैकी अकरा जणांच्या वह्या पाहिल्या. तिथे शिक्षकच भेटले.

आम्ही तातडीने दुसऱ्या जिल्हा परिषद शाळेकडे निघालो. नऊशेएक्याऐंशी नावाच्या भस्मासुराचं अस्तित्व जाणवू लागलं होतं, पण त्याचा आवाका काय असेल ? किंवा 'या नऊशेएक्याऐंशी' भस्मासुराची रेंज कितपत असेल, याचा अंदाज येत नव्हता. केवळ दोन-तीन शाळांना भेट देऊन एखाद्या ठोस निष्कर्षाप्रत यायला मन तयार होत नव्हतं. आम्ही भेट दिलेली तिसरी आणि चौथी शाळा, '१९' च होती !!

आता आवाका लक्षात येऊ लागला होता. '१९' नावाचा व्हायरस जिल्ह्यातल्या सर्व शाळांमधून पसरला असण्याची शक्यता होती. प्रत्येक शाळेत जाऊन '१९' चे '१०९' करत बसायला वेळ नव्हता आणि ते शक्यही नव्हते. या '१९' व्हायरसचे उगमस्थान शोधणे आणि त्यासाठी 'अँटी व्हायरस योजना' तयार करणे, ही योजना 'युजर्स फ्रेंडली' असावी यासाठी प्रयत्न करणे, प्रश्नाचे नेमकेपण जाणून घेऊन आणि शिक्षकांना विश्वासात घेऊन, त्यांच्याच मदतीने एखादी उपाय योजना ठरविणे, असे काहीसे विचार सुरू झाले.

या '१९' व्हायरसमुळे मुलांचं अपरिमित नुकसान होत आहे. आणि ज्यांनी मार्गदर्शन करणं अपेक्षित आहे, तेच काहीसे भरकटलेले आहेत. विचार करताना अर... जाणवलं की, 'समजा, '१९' हा प्रोग्रॅम व्हायरसग्रस्त आहे अशी कल्पना केली तर.... 'असे' आणखी प्रोग्रॅम्स पण मिळू शकतील... कारण आपण अजून सगळ्या फाईल्स तपासल्याच नाहीत !' किंवा, 'गणितात सहज समजलेली ही एक समस्या, गणित, भाषा, विज्ञान, परिसर अभ्यास, इतिहास, भूगोल आणि (द ग्रेट) मूल्यशिक्षण या सगळ्यांचा विचार करायचा झाला तर एकंदर समस्या काय असतील ? त्यांचे स्वरूप कसे असेल ?' हिमनगाचा थोडासाच भाग दिसल्याने काळजी वाटू लागली होती.

ग्रामीण भागात आठ ते दहा शाळांचे मिळून एक केंद्र तयार होते. त्यापैकी एक शाळा केंद्रशाळा असते. केंद्रप्रमुख हा पदवीधर शिक्षक असतो. या दहा शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्याचे काम त्याला करायचे असते. गटसंमेलनाच्या माध्यमातून केंद्रातील सर्व

शिक्षक (प्राथमिक विभाग) महिन्यातून एकदा एकत्र येतात. अध्ययन, अध्यापनाबाबत चर्चा करतात. गटसंमेलनात केंद्रप्रमुखाने मित्र-मार्गदर्शकाची भूमिका बजावणे अपेक्षित असते. एका तालुक्यात दहा केंद्रे आहेत. प्रत्येक केंद्रप्रमुखाने आपापल्या केंद्रातील दोन हुशार, उत्साही शिक्षकांना निवडायचे आहे. या सर्वांची सभा तातडीने बोलावली. सभेला (पदवीधर) दहा केंद्रप्रमुख आणि प्रत्येक केंद्रातील निवडलेले दोन हुशार शिक्षक असे तीस जण हजर होते. याचप्रकारे जिल्ह्यातील तीन वेगवेगळ्या तालुक्यांत, तीन सभांचे आयोजन केले. या सभांतून शिक्षकांशी, केंद्रप्रमुखांशी, गट शिक्षण अधिकाऱ्यांशी, गट विस्तार अधिकाऱ्यांशी आणि प्रशासन अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर मला जे अनुभव आले, ते .सेच्या तसे पुढे मांडत आहे.

● सभेतील तीस जणांना तीस कोरे कागद दिले आणि 'नऊशेएक्याऐंशी भागिले नऊ' हे गणित सोडवायला सांगितले. 'कुणीही कागदावर स्वत:चे नाव लिहू नये, फक्त गणित सोडवावे. कारण, कुणाची काय चूक होते हे जाणून घेण्यापेक्षा एकंदर काय चुका होतात ? हे समजून घेण्यात मला अधिक रस आहे. त्यामुळे मोकळेपणाने गणित सोडवा. कॉपी करू नका. गणित सोडविता येत नसेल तर, कोरा कागद घडी करून परत करा,' अशा स्पष्ट सूचना दिल्या. वर्गात शांतता पसरली. पदवीधर केंद्रप्रमुख आणि निवडलेले हुशार शिक्षक (या शिक्षकांत काही पदवीधर पण होते). मन लावून गणित सोडवू लागले. सर्वांना मिळून पाच ते सात मिनिटे वेळ लागला. मग एका शिक्षकाने स्वयंस्फूर्तीने सर्वांचे घड्या घातलेले कागद गोळा केले. मी सर्व घड्या सोडविल्या. एकही कागद कोरा नव्हता !!तीसपैकी बावीस जणांचे उत्तर होते एकोणीस ! एकाचे उत्तर होते एक पूर्णांक नऊ दशांश !! आणि सात जणांचे उत्तर होते एकशेनऊ. आता सभेला म्हणजे विषयाला कुठून सुरुवात करायची, हा प्रश्न होता. 'मदतीला' उपशिक्षणाधिकारी पाटील होतेच.

'१९' संप्रदायातील एका शिक्षकाला फळ्यावर गणित सोडवायला सांगितले. त्याने आपल्या संप्रदायाशी प्रामाणिक राहून गणित सोडविले. 'भागाकारात गणिताचा ताळा करता येतो व त्यावरून आपणास शोधून काढता येईल, की आपले उत्तर चूक की बरोबर ?' मी असे म्हटल्यानंतर अनेक शिक्षकांच्या चेहऱ्यावर गोंधळ दिसत होता. 'ताळा' अधिक स्पष्ट होण्यासाठी, मी 'वीस भागिले पाच' चे उदाहरण सांगितले. आणि 'नऊशेएक्याऐंशी भागिले नऊ' या गणिताचा ताळा कसा करायचा असे विचारले ? बराच वेळ शांतता होती. १०९ संप्रदायातील शिक्षक बोलण्यास उत्सुक होते, पण मी '१९' गटातील शिक्षकाला प्रश्न विचारला, तेव्हा शिक्षक म्हणाला, 'हे पहा, गणिताचा ताळा करण्याची कल्पना तुमची आहे. तेव्हा उत्तरही तुम्हीच सांगा.' मग '१०९' शिक्षकांच्या मदतीने असे ठरविले की, 'जर एकोणीस गुणिले नऊ या गणिताचे उत्तर नऊशेएक्याऐंशी आले तर फळ्यावर सोडविलेला भागाकार बरोबर आहे.'

मग '१९' गटातील शिक्षकाला विचारले, 'एकोणीस गुणिले दहा किती ?' त्यांना सांगता आले नाही. 'बरं, पंधरा गुणिले दहा किती ?' त्यांना सांगता आले नाही. 'ठीक आहे. दहा गुणिले दहा किती ?' तो म्हणाला, 'शंभर !' 'बरोबर ! तुम्हाला दहा गुणिले दहा करता आले, म्हणजे एकोणीस गुणिले दहासुद्धा करता येतील. समजा, मला पस्तीस गुणिले दहा करायचे असतील तर एक शून्य ठेवायचं, शंभरने गुणायचं असेल तर दोन शून्य ठेवायची. अगदी सोपं आहे पहा. समजलं का ?' त्यांनी मान हलविली. 'मग आता सांगा एकोणीस गुणिले दहा किती ?' त्यांना सांगता आले नाही. 'सांगा ना, काय समजलं नाही, ते विचारा.' 'तुम्ही म्हणालात दहाने गुणायचं असेल तर एक शून्य ठेवायचं. पण हे शून्य कुठे ठेवायचं हे तुम्ही सांगितलच नाही की !!' मला पायाखालची जमीन क्षणभर हलल्यासारखी वाटली !! '१०९' संप्रदायातील एका शिक्षकाकडे हा '१९' शिक्षक सोपवला आणि त्याने या '१९' ला १० व १०० ने कसे गुणावे, हे शिकवावे असे ठरले.

●एका '१९ शिक्षकाला' बोलावून एकोणीस गुणिले नऊ हा गुणाकार फळ्यावर करायला सांगितला. त्याने पहिला प्रश्न विचारला, 'गुणाकार कुठल्या बाजूने करायचा ? उजव्या की डाव्या ?' हा प्रश्न ऐकताच खूपसे शिक्षक खळखळून हसले. त्या '१९' ला धीर देत मी म्हणालो, "तुम्ही जसा वर्गात करता तसा गुणाकार करा. उगाच टेन्शन घेऊ नका." त्या '१९' ने प्रथम एकास मग नवास गुणून, एकोणीस गुणिले नऊ या गणिताचे उत्तर नऊशेएक्याऐंशी लिहिले !! आता ताळा जुळला असल्याने माझी बोलती बंद झाली !! मला सावरायला थोडा वेळ लागला. मी धीर गोळा करून एका '१०९' गटातील शिक्षकाला हाच गुणाकार फळ्यावर करायला सांगितला. त्या शिक्षकाने योग्य पद्धतीने गुणाकार करून उत्तर १७१ ~~१८१~~ असे लिहिले. (माझ्या जीवात जीव आला). त्या '१९' शिक्षकाला प्रश्न विचारला, 'यातले कुठले उत्तर बरोबर वाटतं ?' '१९' म्हणाला, 'दोन्ही !! बहुधा दोन्ही !!'

आता मी रागावण्याच्याही पलीकडे पोचलो होतो. या '१९' संप्रदायाविषयी माझ्या मनात अपार प्रेम निर्माण झालं होतं. यांना आपली समस्याच ओळखता आलेली नाही, म्हणून त्यांनी ती सोडविण्याचा प्रयत्न केलेला नाही. त्यांना समस्येची जाणीव करून दिली तर ते एखाद्यावेळेस त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करतील, अशी आशा मला वाटू लागली. पुन्हा एकदा '१०९' गटाची मदत घेतली. '१९' शिक्षकांनी '१०९' शिक्षकांशी भरपूर चर्चा करावी, गणिताच्या गप्पा माराव्यात, असे ठरले. थोड्यावेळानंतर '१९' शिक्षक आपण काय काय गप्पा मारल्या ते जाहीरपणे सांगतील. या गप्पांमुळे शिक्षक-शिक्षक आंतरक्रिया वाढतील. एखादी संकल्पना परक्या माणसापेक्षा मित्राकडून समजावून घ्यायला नक्की आवडेल, असं वाटलं. थोडाफार फायदाही झाला. शिक्षकांनी गप्पा मारताना वही-पेन घेतलं होतं. वहीत गणिते करता करता गप्पा सुरू झाल्या.

●अजून मुख्य प्रश्न बाकीच होता. 'नऊशेएक्याऐंशी भागिले नऊ' या गणिताचे खरे उत्तर किती ? भाज्य, भाजक हे शब्द वापरायचे नाहीत, असं ठरवलं, (कारण, पुण्या-मुंबईच्या मराठी भाषेत शिकवू नका, असा काही '१९' शिक्षकांचा आग्रहच होता). 'वीस भागिले पाच' हे गणित फळ्यावर लिहून दाखवा, असं एका '१९' शिक्षकाला सांगितलं. त्याने डोकं खाजवलं, गालावरून हात फिरविले, हातातल्या पेनशी चाळे केले, मग डोळे बारीक केले, मान हलविली.मग शांतता ! 'सांगा काय अडचण आहे ?' ते डोळे बारीक करून फळ्याकडे निरखून पहात म्हणाले, "माझ्या मनात कन्फ्यूज झाले आहे !तुम्ही सांगता म्हणून मी हे गणित फळ्यावर 'अक्षरात' लिहीन!!"

इतक्यात '१९' संप्रदायातले एक शिक्षक टुणकन उठले आणि म्हणाले, "द्या खडू" त्यांनी फळ्यावर नेमकं उलटं म्हणजे 'पाच भागिले वीस' असे फळ्यावर लिहीले आणि त्यावर बोट ठेवून वाचलं, 'वीस भागिले पाच' आपण संख्या लिहीताना डावीकडून उजवीकडे लिहीतो, मोजताना मात्र, एकक, दशक, शतक असं उजवीकडून डावीकडे मोजत जातो. भागाकाराच्या बाबतीतपण अशीच गंमत होते आहे, हे लक्षात आलं. मग पुन्हा गणित-गप्पा. वेगवेगळी उदाहरणं. इ.

●बऱ्याच वेळानंतर पुन्हा जुन्याच प्रश्नाकडे आलो. नऊशेएक्याऐंशी भागिले नऊ किती ? आपल्या रोजच्या जीवनात भागाकाराचा संबंध येतो का ? सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत, भागाकाराशी संबंधित किमान दहा उदाहरणे देता येतील का ? पूर्वाश्रमीच्या '१९' पण आता नव्याने '१०९' मध्ये दाखल झालेल्या एका शिक्षकाने हात वर करून सांगितले, 'दहा उदाहरणे फार वाटतात. दोन-तीन उदाहरणे ठीक आहेत.' सर्व शिक्षकांनी माना डोलावल्या. 'ठीक आहे, फक्त एक उदाहरण सांगा.' नव्वद टक्के शिक्षकांना उदाहरण सांगताना आपल्या पगाराची आठवण आली ! असो.

मग '१०९' गटाच्या मदतीने ९८१ भागिले ९ = १०९ हे गणित समजून घेतले. पाच-पाच जणांचा एक गट तयार करून प्रत्येक गटात एक '१०९' असेल, याची काळजी घेतली. प्रत्येक गटाने, आपापल्या गटातील, '१०९' च्या मदतीने भागाकार करताना येणाऱ्या अडचणी ओळखायच्या आहेत आणि त्या सोडवायच्या आहेत. सहा गटांना मिळून चाळीस ते पंचेचाळीस मिनीटे लागली.

● आता सर्वांना हा भागाकार समजला आहे हे मी गृहीत धरले. सकाळी नऊला सभा सुरू झाली होती. तेव्हापासून आम्ही या भागाकाराशी खेळत होतो. आता दुपारचे साडेचार वाजले होते. शिक्षकांना आपल्या अध्यापनातील अडचणी ओळखता आल्या पाहिजेत किंवा काय काय अडचणी असू शकतात याची त्यांना कल्पना तरी हवी. उपस्थित शिक्षकांनी आपल्या अध्यापनातील अडचणी मोकळेपणाने मांडल्या, तर त्या नोंदवून घेऊन, त्या सोडविण्यासाठी गरजाभिमुख गट संमेलनांचे आयोजन करणे शक्य होईल, असा विचार मी करत होतो.

"प्रत्येक शिक्षकाने, आपल्याला गणित, भाषा किंवा विज्ञान शिकविताना येणारी अडचण सांगायची आहे. आणि तुम्हाला कुठलीच अडचण नसेल तर ती तुमची अडचण आहे !" एका शिक्षकाने झटक्यात हात वर केला आणि तणतणत म्हणाला, "नवीन अध्यापन तंत्र !" मी समजुतीच्या सुरात विचारलं, "नवीन अध्यापन तंत्र ही अडचण कशी काय असू शकते ? " मला समजावत तो शिक्षक म्हणाला, "सर, नवनवीन अध्यापन तंत्रामुळे आमच्या मनात गोंधळ निर्माण होतो. फार पूर्वी आनंददायी शिक्षण पद्धती आली. नंतर नवीन पाठ्यपुस्तकं, त्यानंतर क्षमता आल्या आणि आता तुम्ही म्हणता 'नऊशेएक्याऐंशी भागिले नऊ' या गणिताचे उत्तर एकशेनऊ काढा, कालपर्यंत आम्ही मुलांना याच गणिताचे उत्तर 'एकोणीस' शिकवीत होतो, आता तुम्ही सांगता म्हणून एकशेनऊ शिकवायचं ? मुलं आम्हाला वेड्यात काढतील !! तुम्ही काहीतरी एक पॉलिसी ठरवा. सारखा-सारखा बदल करू नका. कारण त्यामुळे आमच्या डोक्यात कन्फ्यूज वाढतो." त्यांचीच 'री' ओढत दुसरे शिक्षक म्हणाले, "अहो रागावू नका, आमच्या शिक्षकांनी पण आम्हाला '१९' शिकवलं ! तुमच्या या नवीन '१०९' तंत्रामुळे जरा गोंधळ होतोय, पण साहेब, शासनाने जर '१०९' हे उत्तर फायनल केले तर आमचा त्याला पाठिंबा आहे."

मी माझ्या या शिक्षक मित्रांना भागाकार समजावून सांगायला कमी पडतो आहे, याची मला तीव्रतेने जाणीव झाली, पण..... त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे, शासनाविषयी, पाठ्यपुस्तकांविषयी, नवीन तंत्राविषयी त्यांच्या मनात आकस आहे !

शिक्षकांना समजून घ्यायला आणि वेळ पडल्यास समजवायला अधिकारीवर्गाकडे सवड नाही की त्यांची मनोवृत्तीच नाही ? पाठ्यपुस्तकाबाहेर शिक्षक पडत नसल्याने त्यांच्यात शिथिलता आली आहे ? चाकोरीतच आनंद वाटतो आहे ?

पण एक खरं, समस्या कळल्यामुळे आता उपाय शोधणं सोपं होणार आहे. तीसजणांपैकी सातजण '१०९' आहेत, हे किती आशादायक आहे. थोडा आणखी प्रयत्न केला तर '१०९' ची संख्या वाढू शकेल, सातचे सत्तावीस होऊ शकतील आणि मग तीस काही फार लांब नाही.

● प्राथमिक शिक्षणातील '१९' आणि '१०९' ची ही कहाणी. कुठेही भेटू शकतात हे '१९,' पण सोबत असतात '१०९' सुद्धा ! खूपवेळा या '१९' ना माहितीच नसतं की आपण चुकतो आहोत. मित्रत्वाने त्यांची चूक त्यांना दाखवून दिली, तर ते नक्कीच '१०९' त दाखल होतात. जो बदलतो तो शिक्षक. '१०९' वाल्यांची जबाबदारी थोडी अधिक आहे हे खरंच, पण '१०९' गटाने जर '१९' गटाची जबाबदारी घेतली, तर फार काळ '१९', एकोणीस राहणार नाहीत, याची मला खात्री आहे ! तुम्हाला........ ?

( महाराष्ट्र टाईम्सच्या सौजन्याने )

■■